अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९४ । सोमवार २७ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'
भाग ३९

### मनुष्याने 'सहज' व्हावे

एका बीजाला जर अंकुरायचे असेल, तर त्याला एक शेतकरी स्वतः जमिनीमध्ये पेरतो, त्याला पाणी घालतो, त्याचे संगोपन करतो आणि त्याला मोठेही करतो. त्याचप्रमाणे तुमचेही आहे, जे आजपर्यंत घडले आहे.आज तुम्ही एका सूक्ष्म जीवापासून मनुष्य रूपाने येथे बसला आहात; ही जी तुमची उत्क्रांती झाली आहे, जो तुमचा विकास झाला आहे, तो देखील त्याच परमात्म्याने केला आहे. आणि तुम्हाला इथून पुढे जायचे आहे, ते देखील तोच करणार आहे.परंतु मनुष्यासाठी सर्वात कठीण गोष्ट हीच आहे की त्याने 'सहज' व्हावे. आणि ते सहजच आहे, पण त्याने स्वतः ला गुंतागुंतीत अडकवून ठेवले आहे. हे कसे शक्य आहे, हे त्याला समजत नाही. आपण पाहतो की पूर्वी अनेक लोक कठोर तपश्चर्येनंतर, जंगलात राहून हजारो वर्षांच्या घोर तपश्चर्येनंतर या स्थितीला प्राप्त व्हायचे,ज्याला ते 'निर्विचार समाधी' म्हणायचे. अजून त्यात खूप मेहनतीची गरज असते. त्यानंतर रोपे थोडी मोठी होतात आणि जेव्हा 'बहार' येते, तेव्हा हजारो फुले उमलतात. कलियुगात कोणी परमात्म्याचा विचार करावा, सर्वत्र हाहाकार, अंधकार, पाप आणि द्वेष पसरलेला आहे. जिथे मनुष्य रात्रंदिवस पाहतो की... परिणाम म्हणून आज 'सहजयोग' तुमच्या समोर उभा आहे. ०१/०४/१९७६ दिल्ली

# डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर अंदाधुंद गोळीबार

## सुरक्षा रक्षकांनी वाचवले; जगात खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वॉशिंग्टन :** अमेरिकेची राजधानी असलेल्या वॉशिंग्टन डीसीमधील हिल्टन हॉटेलमध्ये आयोजित 'व्हाईट हाऊस कॉरेस्पॉन्डंट्स डिनर' कार्यक्रमात गोळीबाराची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यानंतर अमेरिकन सीक्रेट सर्व्हिसने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना तातडीने सुरक्षा कवच देत व्यासपीठावरून सुरक्षित स्थळी हलवले. या घटनेमुळे अमेरिकेच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली असून सुदैवाने ट्रम्प आणि त्यांचे मंत्रिमंडळ सुरक्षित आहे. दरम्यान गोळीबार करणाऱ्यांना सुरक्षा एजन्सीज ने ताब्यात घेतले आहे.



**■ मेलानिया ट्रम्प आणि उपाध्यक्ष जे.डी. व्हान्स हे ट्रम्प यांच्यासोबत मुख्य टेबलवर उपस्थित होते. अनेक कॅबिनेट मंत्री आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारीही यावेळी उपस्थित होते. प्रशासनातील एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, कॅबिनेटमधील कोणत्याही सदस्याला इजा झालेली नाही. हा जेवणाचा कार्यक्रम विशेष होता, कारण राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांनी या कार्यक्रमाला पहिल्यांदाच हजेरी लावली होती. हा एक असा कार्यक्रम आहे जिथे सामान्यतः मीडिया, राजकारण आणि मनोरंजन क्षेत्रातील व्यक्ती एकत्र येतात, परंतु ट्रम्प आणि मीडिया यांच्यातील दीर्घकाळापासूनच्या तणावपूर्ण संबंधांमुळे हा कार्यक्रम आधीच चर्चेत होता.**

मिळालेल्या माहितीनुसार, जेव्हा गोळीबाराचा आवाज आला, तेव्हा व्यासपीठावर ट्रम्प यांच्यासह उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेंस आणि मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे सदस्य उपस्थित होते. सीक्रेट सर्व्हिसच्या एजंटनी तातडीने परिस्थितीवर नियंत्रण मिळवत 'शूटर' ओरडत ट्रम्प यांना घेरले. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व महत्त्वाचे नेते सुरक्षित आहेत. या हल्ल्याचा उद्देश अद्याप स्पष्ट झालेला नसला तरी, एका संशयित हल्लेखोराला ताब्यात घेण्यात आले.

विशेष म्हणजे, या घटनेच्या एक दिवस आधी याच हॉटेलच्या भिंतींवर ट्रम्प आणि लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीन यांचे फोटो आणि व्हिडिओ प्रोजेक्टरच्या साहाय्याने दाखवण्यात आले होते. या व्हिडिओंमध्ये ट्रम्प प्रशासनावर एपस्टीन प्रकरणातील फाईल्स दाबल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर झालेला हा गोळीबार हा केवळ योगायोग आहे की एखादा नियोजित कट, याचा तपास आता अमेरिकन यंत्रणा करत आहेत.

# जुने महसूल कायदे बदलून प्रशासन लोकाभिमुख करणार

## शिर्डीतील जनता दरबारात महसूलमंत्री बावनकुळे यांचे आश्वासन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** राज्याचे महसूल खाते हे नागरिकांच्या मालमत्तेचे रक्षण करते. त्यामुळे जुन्या महसूल कायद्यांमधील क्लिष्ट प्रक्रिया कमी करून सर्वसामान्यांना जलद न्याय देण्यासाठी कायदे बदलण्यात येत आहेत, असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.



नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांची थेट सोडवणूक करण्यासाठी शिर्डी अपर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जनता दरबारात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शैलेश हिंगे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, माजी आमदार स्नेहलता कोल्हे आदी उपस्थित होते.

महसूलमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, शेतीच्या रस्त्यांचे वाद मिटवण्यासाठी पुढील पाच वर्षांत सर्व पाणंद रस्ते बारमाही केले जातील व त्यांच्या कडेला वृक्षलागवड केली जाईल. सातबारा उताऱ्यावरील मृत व्यक्तींचे नाव कमी करण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी तहसीलदारांनी स्वतः हून ही दुरुस्ती करावी. जमिनीच्या मोजणीसाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी खासगी मोजणीदार नेमून ड्रोनच्या साहाय्याने केवळ पंधरा दिवसांत मोजणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

गोरगरिबांना हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार २०११ पूर्वी गायरान व सरकारी जागेवर बांधलेली निवासी घरे नियमित केली जाणार आहेत. या निर्णयामुळे भटके विमुक्त, पारधी समाजासह अनेक गरिबांना मोठा आधार मिळेल. केवळ एक हजार रुपये शुल्क आकारून ग्रामपंचायतीच्या दप्तरात या घरांची नोंदणी करून मालकी हक्क दिला जाईल, असेही श्री. बावनकुळे यांनी सांगितले. **(पान ४ वर)**

# मुंबई उच्च न्यायालय भरतीत 'राष्ट्रभाषा' वाद

### मराठी एकीकरण समिती आक्रमक : घटनेत तरतूद नसताना विचारलेल्या चुकीच्या प्रश्नामुळे संताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयातील शिपाई आणि हमाल पदासाठीच्या भरती परीक्षेवरून सध्या राज्यात नवा वाद उफाळला आहे. परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत भारताची 'राष्ट्रभाषा' कोणती, असा प्रश्न विचारण्यात आल्याने 'मराठी एकीकरण समिती'ने आक्रमक पवित्रा घेतला असून, प्रशासनाच्या या भूमिकेवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.



मुंबई उच्च न्यायालयाच्या शिपाई पदासाठी नुकतीच लेखी परीक्षा पार पडली. या परीक्षेत भारताची राष्ट्रभाषा कोणती? असा प्रश्न विचारण्यात आला होता आणि त्यासाठी 'हिंदी' हा पर्याय योग्य असल्याचे दर्शवण्यात आल्याचा आरोप होत आहे. मात्र, भारतीय राज्यघटनेनुसार भारताला कोणतीही 'राष्ट्रभाषा' नाही. संविधानाच्या कलम ३४३ नुसार हिंदी ही केवळ 'अधिकृत राजभाषा' आहे. घटनेने कोणत्याही भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा दिलेला नसताना, उच्च न्यायालयासारख्या कायदेशीर संस्थेच्या परीक्षेत असा प्रश्न विचारला गेल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

या प्रकारानंतर मराठी एकीकरण समितीने विधी व न्याय विभागाकडे धाव घेतली आहे. समितीच्या मते, अशा चुकीच्या प्रश्नांमुळे उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होतो आणि भाषिक राजकारणाला खतपाणी मिळते. ज्या उमेदवारांनी 'हिंदी' हा **(पान ४ वर)**

## महत्त्वाचे..

### बायोगॅसची टाकी साफ करताना तिघांचा मृत्यू

पुणे : जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील बेलसर येथे धक्कादायक घटना घडली आहे. बायोगॅसची टाकी स्वच्छ करण्यासाठी गेलेल्या तिघांचा मृत्यूझाल्याची माहिती समोर येत आहे. आज दुपारी साधारण तीनच्या सुमारास ही घटना उघडकीस आली आहे.

मृत्यू झालेले तिघेही कामगार हे बिहार मधील मधील असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. बेलसर येथील एका मशरूम कंपनीमध्ये हे तीनही कामगार काम करत होते. घटनेनंतर जेजुरी पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले असून तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. या घटनेनंतर परिसरात खळबळ माजली आहे. हे तिघेही कामगार बायोगॅसची टाकी स्वच्छ करण्यासाठी गेले होते, यावेळी त्यांचा मृत्यू झाला आहे. हा घटनेमुळं हळहळ व्यक्त केली जात आहे.

# धीरेंद्र शास्त्रींचा अखेर माफीनामा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शिवरायांबाबत केलेल्या वादग्रस्त विधानावर बोलताना बागेश्वर बाबांनी म्हटले की, माझे वक्तव्य वेगळ्या पद्धतीनं दाखवलं जातं आहे. मला याच दुख आणि खेद आहे. शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, आम्ही शिवरायांची निंदा ऐकू शकतं नाही. आम्ही छत्रपती शिवरायांना मानणारे आहोत. गुरू महिमासाठी मी ते वक्तव्य केलेलं होतं. माझ्या वक्तव्यांनी कुणाचं मन दुखावलं असेल तर मी माफी मागतो. माझं वक्तव्य चुकीच्या पद्धतीनं दाखवण्यात आलं आहे.



धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी म्हटले होते की, 'छत्रपती शिवाजी महाराज जेव्हा युद्ध करता करता थकले, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांना वाटलं की आता आपण थकलोय, तेव्हा एक दिवस छत्रपती शिवाजी महाराज समर्थ रामदास स्वामी यांच्याकडे गेले आणि आपले मुकुट काढले व सांगितले की, मी अनेक लढाई लढलो, अनेक युद्ध केले, पण आता पुढे लढायचे नाहीय. तुम्ही एक दया करा की, हे मुकुट तुम्हा आता सांभाळा, हे राज्य सांभाळा.' यानंतर आता बागेश्वर बाबांनी माफी मागितली आहे.बागेश्वर बाबांच्या या विधानानंतर संपूर्ण राज्यातून संताप व्यक्त करण्यात आला होता. मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले होते की, **(पान ४ वर)**

# १२ हजार ९१५ सरकारी कर्मचाऱ्यांनी लाटले लाडकी बहीण योजनेचे लाभ

## पगार थांबवले : पदोन्नती, मूल्यमापन थांबवण्याचे सरकारचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण योजने'त मोठ्या प्रमाणावर अनियमितता उघडकीस आल्यानंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. ताज्या आकडेवारीनुसार, सरकारने आतापर्यंत अपात्र लाभार्थ्यांकडून अंदाजे ११ कोटी रुपये वसूल केले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या योजनेचा गैरफायदा घेणाऱ्यांमध्ये मोठ्या संख्येने सरकारी कर्मचारी आणि पुरुष आहेत. जे पात्रतेच्या निकषांनुसार स्पष्टपणे अपात्र होते.

**सध्या या योजनेअंतर्गत १.५७ कोटी लाभार्थी असून त्यासाठी सरकारने ३६,000 कोटी रुपयांचे बजेट मंजूर केले आहे. महिला आणि बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी जाहीर केले आहे की, लाभार्थ्यांच्या ई-केवायसी पडताळणीची अंतिम मुदत ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. पात्र लाभार्थ्यांसाठी आपली कागदपत्रे नियमित करण्याची ही शेवटची संधी असेल.**




प्राथमिक तपासात सरकारने सुमारे २,४०० कर्मचाऱ्यांची ओळख पटवली होती, परंतु आरटीआयद्वारे मिळालेल्या माहितीनुसार, किमान १२,९१५ सरकारी कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे १,५०० रुपयांची मासिक मदत घेतली होती. अनेक विभागांनी अपात्र कर्मचाऱ्यांच्या पगारातून थेट रक्कम कापायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार दोषी कर्मचाऱ्यांची पदोन्नती आणि मूल्यमापन थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कारवाईच्या भीतीने, काही लाभार्थ्यांनी स्वेच्छेने पैसे परत केले आहेत आणि योजनेतून आपली नावे काढून टाकली आहेत. तपासात असेही उघड झाले आहे की, या योजनेअंतर्गत पुरुषांच्या खात्यातही कोट्यवधी रुपये हस्तांतरित करण्यात आले होते. ऑक्टोबर २०२५ पर्यंत, अंदाजे १२,४३१ पुरुष आणि ७७,९८० अपात्र महिलांना चुकीच्या पद्धतीने १६४.५२ कोटी रुपये देण्यात आले होते.

महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव यांनी पुष्टी केली आहे की, पुरुष लाभार्थ्यांकडूनही लवकरच वसुलीची प्रक्रिया सुरू केली जाईल. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या अनियमिततेला केवळ सुरुवात म्हटले असून, याहून मोठे घोटाळे उघडकीस येऊ शकतात असे सुचवले आहे. सखोल तपासानंतर, अंदाजे ५७ लाख लाभार्थ्यांना यादीतून वगळण्यात आले आहे.

# राज्यात उष्णतेची लाट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यभर उष्णतेचा पारा प्रचंड वाढला असून नागरिकांच्या अंगाची अक्षरशः लाहीलाही होत आहे. मराठवाडा, विदर्भासह संपूर्ण राज्यात उन्हाचा तडाखा वाढला असून दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडताना दिसत आहेत.

**परभणी नाशिकमध्ये उष्माघाताचे बळी**

परभणीत ३७ वर्षीय शिवाजी बबन कांबळे यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. दिवसभर उन्हात फिरल्यानंतर त्यांना चक्कर आली आणि त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. नाशिक मध्ये ही उष्माघाताने एका नागरिकाचा मृत्यू झाल्याची चर्चा आहे.

अकोल्यात काल या मोसमातील सर्वाधिक ४५.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसांत तापमान ४६ अंशांपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे शहरात ऐन दुपारी अघोषित संचारबंदी असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राज्यात उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत असून अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यात उष्णतेची लाट तीव्र झाली आहे. दोन्ही शहरांमध्ये तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पुढे **(पान ४ वर)**

# अहिल्यानगर जिल्ह्यात 'मिशन दूध गुणवत्ता' दोनवेळा दूध संकलनासाठी प्रशासनाची जनजागृती

## दूध भेसळ रोखण्यासाठी आणि उच्च गुणवत्तेचे उत्पादन टिकवण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे पाऊल; दूध उत्पादक आणि केंद्रांना आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्याच्या एकूण दूध उत्पादनात ३५ टक्के वाटा उचलणाऱ्या आणि दूध उत्पादनात अग्रेसर असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्याने आता दुधाची गुणवत्ता आणि शुद्धता टिकवण्यासाठी कंबर कसली आहे. जिल्ह्यात दूध भेसळ रोखण्यासाठी आणि दुधाचा दर्जा जागतिक मानकांनुसार राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता दिवसातून दोनवेळा दूध संकलन करण्याची मोहीम हाती घेतली आहे.

जिल्ह्यात दररोज सुमारे ४७ लाख लिटर दुधाचे उत्पादन होते. मात्र, भौगोलिक विस्तार मोठा असल्याने अनेक शेतकरी आणि केंद्रचालक वाहतूक खर्च वाचवण्यासाठी दिवसातून एकदाच दूध संकलन करतात. तज्ज्ञांच्या मते, सकाळी काढलेले दूध सायंकाळपर्यंत साठवून ठेवल्यास त्यात जिवाणूंची वाढ होते. जेव्हा हे शिळे दूध ताज्या दुधात मिसळले जाते, तेव्हा त्याची 'अल्कोहोल चाचणी' पॉझिटिव्ह येते. यामुळे दुधाची 'हिट स्टॅबिलिटी' कमी होऊन चीज, बटर आणि मिल्क पावडर यांसारख्या उच्च दर्जाच्या पदार्थांच्या निर्मितीवर प्रतिकूल परिणाम होतो. साठवून ठेवलेल्या दुधाची नैसर्गिक गुणवत्ता कमी झाल्याने, ती टिकवून धरण्यासाठी अनेकदा भेसळीचा आधार घेतला जातो. जिल्ह्यात सहकारी आणि खाजगी मिळून ५०० हून अधिक संकलन केंद्रे आहेत. विशेषतः श्रीगोंदा, कर्जत, जामखेड आणि पारनेर या तालुक्यांतून पुणे जिल्ह्यातील मोठ्या प्रकल्पांना दूध पुरवठा होतो. हे प्रकल्प कमी गुणवत्तेचे दूधही स्वीकारत असल्याने येथे एकावेळाच संकलन करण्याचा कल अधिक आहे, जो भविष्यात दूध व्यवसायासाठी घातक ठरू शकतो.

**जिल्हा दूध उत्पादनात अग्रेसर आहे, पण केवळ संख्यात्मक वाढ पुरेशी नाही. उच्च गुणवत्तेचे दूध हेच आमचे ध्येय आहे. दुधाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी आणि भेसळीला आळा घालण्यासाठी दोनवेळा संकलन होणे अनिवार्य आहे.**

**-गिरीश सोनोने,**
**जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी.**

जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीची दखल घेत संबंधित विभागांची बैठक बोलावली आहे. संगमनेर, राहाता, राहुरी या तालुक्यांत दोनवेळा संकलन होत असले तरी उर्वरित तालुक्यांतही ही पद्धत लागू करण्यासाठी जनजागृती केली जात आहे.

# संपादकीय

## मायबोली ते व्यवहाराची भाषा

महाराष्ट्राच्या मातीत राहून, इथली भाकरी खाऊन जर कुणाला इथल्या भाषेचा विटाळ होत असेल, तर त्यांना कायद्याचा इंगा दाखवण्याशिवाय पर्याय उरला नाही, हेच राज्य सरकारच्या ताज्या निर्णयावरून स्पष्ट होते.

कोणत्याही भाषेचे अस्तित्व हे केवळ ग्रंथालयातील पोथ्यांमध्ये किंवा साहित्य संमेलनांच्या भव्य मांडवांमध्ये सुरक्षित नसते. भाषा टिकते ती लोकांच्या ओठांवर आणि बहरते ती दैनंदिन व्यवहारांतून. ज्या भाषेचा वापर व्यवहारातून हद्दपार होतो, ती भाषा हळूहळू इतिहासाच्या पानात जमा होते. मराठी भाषेच्या बाबतीतही अशीच काहीशी भीती गेली अनेक वर्षे व्यक्त केली जात होती. विशेषतः राज्याची राजधानी असलेल्या मुंबईत मराठी माणूस आणि मराठी भाषा यांच्या अस्तित्वाचा संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने १ मे २०२६ पासून रिक्षा, टॅक्सी, ओला, ऊबर आणि ई-बाईक टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो केवळ स्वागतार्ह नसून काळाची गरज आहे.

मराठी भाषेच्या मुद्द्यावरून आजवर अनेक आंदोलने झाली, राजकारण तापले. पण ठोस प्रशासकीय पावले उचलली गेली नव्हती. २०१९ मध्येच असा निर्णय घेण्याचे सूतोवाच झाले होते, परंतु त्याची अंमलबजावणी कागदावरच राहिली. आता मात्र परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतलेली ही भूमिका अत्यंत कौतुकास्पद आहे. जे लोक महाराष्ट्रात रोजीरोटीसाठी येतात, इथल्या पायाभूत सुविधांचा वापर करतात, त्यांना इथल्या लोकांशी संवाद साधण्यासाठी स्थानिक भाषेचे ज्ञान असणे हे केवळ कायदेशीर बंधन नसून ते त्यांचे नैतिक कर्तव्यही आहे.

मुंबई हे जागतिक शहर आहे, यात शंका नाही. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला देशात कुठेही जाऊन व्यवसाय करण्याचा अधिकार दिला आहे. परंतु, हा अधिकार वापरताना त्या राज्याच्या भाषिक आणि सांस्कृतिक अस्मितेचा अवमान करण्याचा अधिकार कुणालाही दिलेला नाही. दुर्दैवाने, मुंबईत येणाऱ्या अनेक परप्रांतीय वाहनचालकांमध्ये एक प्रकारचा उद्धटपणा किंवा 'उर्मटपणा' पाहायला मिळतो. प्रवासी मराठीत बोलला की त्याला न समजण्याचे सोंग करणे किंवा मुद्दाम हिंदीतच उत्तर देणे, हे प्रकार मराठी माणसाच्या सहनशीलतेचा अंत पाहणारे आहेत.

आपण जर दक्षिणेकडील राज्यांकडे पाहिले, तर तिथे भाषिक अस्मितेबाबत कमालीची सजगता दिसते. तामिळनाडू, कर्नाटक किंवा केरळमध्ये गेलेला कोणताही उत्तर भारतीय असो वा परदेशी, त्याला तिथल्या भाषेशी जुळवून घ्यावेच लागते. तिथे केंद्रातील सत्ताधिशांनीही भाषेच्या मुद्द्यावर नख लावण्याचा प्रयत्न केला, तर जनता रस्त्यावर उतरते. मराठी माणूस मात्र या बाबतीत अत्यंत सोशिक आणि उदार राहिला आहे. आपल्या या 'उदारपणा'चा गैरफायदा घेऊन जर कुणी मराठी भाषेची पत्रास ठेवणार नसेल, तर आता 'मराठी बाणा' दाखवण्याची वेळ आली आहे.

दुकानांच्या पाट्या मराठीत असायला हव्या असा नियम असूनही, अनेक ठिकाणी इंग्रजी अक्षरांच्या कोपऱ्यात मराठी अक्षरे 'अंग चोरून' उभी असल्याचे दिसते. ही परिस्थिती बदलण्यासाठी केवळ नियम असून चालत नाही, तर त्या नियमाचा धाक असणे आवश्यक आहे. राज्य सरकारने आता स्पष्ट केले आहे की, जे चालक मराठी बोलणार नाहीत किंवा शिकणार नाहीत, त्यांचा परवाना आणि बिल्ला रद्द केला जाईल. हा कठोर निर्णय मराठी भाषेच्या संवर्धनासाठी संजीवनी ठरणार आहे.

सरकारने केवळ दंडुकेशाही न वापरता सकारात्मक पाऊलही उचलले आहे. अमराठी वाहनचालकांसाठी मराठी भाषेचा विशेष अभ्यासक्रम तयार केला जाणार आहे. त्यांना ही भाषा शिकण्याची संधी दिली जाणार आहे. असे असतानाही, 'ऑटो रिक्षाचालक-मालक संघटने'ने या निर्णयाला विरोध करून आंदोलनाचा इशारा देणे हे अनाकलनीय आणि निषेधार्ह आहे. ग्राहक हा राजा असतो, असे मानणाऱ्या व्यवसायात जर ग्राहकाची भाषाच नाकारली जात असेल, तर तो व्यवसाय किती काळ टिकणार? रिक्षा-टॅक्सी चालकांचा थेट संबंध सर्वसामान्य जनतेशी येतो. रुग्णालय, रेल्वे स्टेशन किंवा शाळा-कॉलेजला जाणारा सामान्य मराठी माणूस जेव्हा रिक्षात बसतो, तेव्हा त्याला आपल्या भाषेत संवाद साधता येणे हा त्याचा हक्क आहे.

निर्णय घेणे सोपे असते, पण त्याची अंमलबजावणी करणे हे खरे आव्हान आहे. १ मे २०२६ पासून हा नियम लागू होणार आहे. केवळ सरकारी आदेश काढून न थांबता, आरटीओ आणि पोलीस प्रशासनाने याची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच, राजकीय पक्षांनीही आपल्या मतपेढीचे राजकारण बाजूला ठेवून या मराठीच्या मुद्द्यावर एकत्र येणे गरजेचे आहे.

मराठी ही केवळ संवादाची भाषा नाही, तर ती या मातीची संस्कृती आहे. जो या संस्कृतीत समरस व्हायला तयार नाही, त्याला या मातीत व्यवसाय करण्याचा अधिकार पोहोचत नाही. ज्यांना मराठी भाषेचा अभिमान वाटण्याऐवजी तिचा ओझे वाटते, त्यांनी खुशाल दिल्लीच्या तख्ताचे मांडलिक व्हावे; पण महाराष्ट्राच्या अस्मितेशी खेळू नये.

परिवहन विभागाचा हा निर्णय मराठी भाषेला केवळ सन्मान देणारा नाही, तर तो मराठी माणसाला त्याच्याच राज्यात 'मान ताठ' करून जगण्याची संधी देणारा आहे. शासकीय कार्यालये, बँका, रुग्णालये आणि आता प्रवासी वाहतूक या सर्वच क्षेत्रांत मराठीचा डंका वाजलाच पाहिजे. भाषेचा हा जागर घराघरांत आणि मनामनांत पोहोचवण्यासाठी सरकारने उचललेले हे पाऊल मैलाचा दगड ठरेल. आता सर्वांनी पक्षभेद विसरून या निर्णयाच्या पाठीशी उभे राहण्याची वेळ आली आहे.

कारण, मराठी भाषेचा हा सन्मान, हीच महाराष्ट्राची खरी ओळख आहे!

## संजीवनी आयुर्वेदा कॉलेजची प्रीता शेजवळ राज्यस्तरीय संगीत महोत्सवात प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगांव:** संजीवनी आयुर्वेदा कॉलेज अँड रिसर्च सेंटरच्या प्रीती अनिल शेजवळ हीने सोलो वेस्टर्न व्होकल या गायन प्रकारात महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स आयोजीत 'युथ फेस्ट २०२६' अंतर्गत 'स्पंदन २०२६' या राज्यस्तरीय संगीत महोत्सवात प्रथम क्रमांक मिळवुन संजीवनी आयुर्वेदा कॉलेजच्या शिरेपेचात मानाचा तुरा खोवला. तर याच स्पर्धेत श्रुती नामदेव पठारे हीने सोलो लाईट इंडियन व्होकल या गायन प्रकारात तृतिय क्रमांकावर आपली मोहर उमटवुन राज्यात संजीवनी सर्वच क्षेत्रात अग्रेसर असल्याचे सिध्द केले.

स्पंदन २०२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यभरातुन ३० पेक्षा अधिक आयुर्वेदा महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धा सिन्नर येथे सपन्न झाल्या. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विध्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू विकसित करण्यासाठी संजीवनी आयुर्वेदा महाविद्यालयात सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. अभ्यासक्रमासोबतच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही विध्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते. याच प्रयत्नांचा परिणाम म्हणून महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी विविध स्तरांवरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत असून संस्थेचे नाव उंचावत आहेत.वैद्यकिय शिक्षणातुन सक्षम डॉक्टर झाडविण्याबरोबरच विद्यार्थी उत्तम नागरीक घडावेत यासाठी संजीवनी नेहमी कटीबध्द असते.



# राज्य सरकार सर्वसामान्यांच्या प्रश्नांना बळकटी देणार : महसूलमंत्री बावनकुळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई:** राज्यातील गोरगरीब सर्वसामान्य मध्यमवर्गीय लोकांच्या मूलभूत गरजांच्या प्रश्नांची सोडवणुकीसाठी प्रत्येक विभागाच्या कक्षातील घटकातील प्रश्नांना एक नाविन्यपूर्ण पाऊल टाकून सर्वसामान्यांचे मनातील स्वप्न साकार करण्यासाठी प्रश्नांना बळकटी देऊन तो सोडवण्याचा महायुती सरकारचा प्रयत्न असेल असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री तडफदार नेतृत्व चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

मंत्री बावनकुळे यांनी कुटुंबीयांसमवेत काल रात्री साडेदहा वाजता शनिशिंगणापूरचे दर्शन घेतले. याप्रसंगी देवस्थानच्या वतीने प्रांतधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय बिराजदार, व कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी त्यांचे स्वागत केले . अनेक नागरिकांनी राज्य सरकार आणि घेतलेल्या निर्णयाचे जोरदार स्वागत करून समाधान व्यक्त केले. त्यावर नामदार मंत्री बावनकुळे यांनी आम्ही बोलतो आणि करतो ही असे महायुती सरकार राज्यात सक्षम कारभार करत असल्याचा निर्वाळा दिला. यावेळी ओबीसी जिल्हा अध्यक्ष व तैलिक महासाभेचे राज्य सदस्य वतीने माजी सरपंच देविदास साळुंके , पत्रकार विजय खंडागळे,प्रीतम साळुंके,भीमा महाले यांनी तर पक्षाच्या वतीने भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष नितीन दिनकर, युवा कार्यकर्ते ऋषिकेश शेटे, मीडियाचे बंडू शिंदे, दिलीप भालशिंग, अनिल मोहिते, साहेब होनराव, ऍड. सयाराम बानकर,संभाजी नगरचे शिवा महाले, ज्ञानेश्वर काळे, भय्या गंधे, निलेश साळुंके, ब्रह्म साळुंके,यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. तैलिक समाजाच्या वतीने समाजाचे पदाधिकारी देविदास साळुंके यांनी त्यांचे आहिल्यादेवीची प्रतिमा देऊन स्वागत केले.

**कार्यकर्त्यांचा दुष्काळ**

ना. चंद्रशेखर बावनकुळे शनिशिंगणापूर मध्ये दाखल झाले असता तेथे स्थानिक शनिशिंगनापूरातील कार्यकर्त्यांचा अक्षरशः दुष्काळ दिसून आला. शासन नियुक्त होणारे विश्वस्त नवनिर्वाचित मंडळ असल्याचे कारण चर्चेत होते. ग्रामस्थांच्या वतीने तंटामुक्ती अध्यक्ष बाळासाहेब बोरुडे व राज्य पोलीस पाटील संघटनेचे सदस्य अ‍ॅड. सयाराम बानकर यांनी नामदारांचा सन्मान केला.

यावेळी ना. बावनकुळे यांनी देवस्थान कारभाराची चौकशी गुलदस्त्यात असताना विश्वस्त मंडळाची मुदत संपल्यावर नवीन विश्वस्ताची लवकरच यादी प्रसिद्ध होईल, असे सांगितले.



# सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य कुटुंबासाठी द्यावे : आ. ओगले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र सेवा मंडळ संचलित प्राथमिक विद्यालय शंकरराव सतोबा डावखर कन्या विद्यालय व प्रेमजी रतनसी पटेल हायस्कूल मधील मुख्याध्यापिका संजीवनी खलाटे ज्येष्ठ शिक्षिका संगीता देशमुख 'वरिष्ठ लिपिक दिनेश तरटे, लिपिक परसराम वेताळ, नाईक समाधान लोखंडे यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये बोलताना श्रीरामपूर तालुक्याचे आ. हेंमत ओगले म्हणाले की, आत्तापर्यंत आपण आपला आयुष्य संस्था शाळेसाठी दिले सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आपल्या कुटुंबासाठी देऊन जीवन सुख समाधानाने जगावे असे प्रतिपादन केले.



यावेळी संस्थेचे चेअरमन संजय फंड नगराध्यक्ष तथा विश्वस्त करण ससाने ज्येष्ठ विश्वस्त नारायणराव डावखर महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर संघटनेचे राज्याचे अध्यक्ष वाल्मीक सुरासे, सचिन गुजर, बाबा साहेब दिघे, पाराजी मोरे, समशेर पठाण, राजू पठाण, संस्थेचे विश्वस्त भारतीताई कांबळे, कांतीतीशेठ पटेल उपस्थित होते.

नगराध्यक्ष करण ससाणे यांनी सेवानिवृत सेवकांबद्दल ऋण व्यक्त करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. चेअरमन संजय फंड यांनी सेवा निवृत सेवकांनी संस्था शाळा नावारूपास आणण्यासाठी भरपूर कष्ट घेतलें . यापुढे ही जेव्हा गरज असेल तेव्हा सर्वांचा सन्मानच के ला जाईल असे प्रतिपादन केले .

यावेळी संस्थेचे विश्वस्त नारायणराव डावखर यांनी त्यांचे उत्सव मंगल कार्यालय क्रार्यक्रम साठी मोफत उपलब्ध करून दिले . कार्यक्रम यशस्वीसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती सुवर्णा माला बोधक 'दिलीप शेवाळे ' सौ . वंदना वलटे तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नानासाहेब म्हेत्रे, सुवर्णा आखेगावकर, भारत तुपे, अतुल खर्डे आदींनी केले.

# बॉक्सिंग अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची ११ गोल्ड मेडल घेत उत्कृष्ट कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** जय बजरंग युवा सांस्कृतिक क्रीडा ग्रामीण शैक्षणिक मंडळ व अहमदनगर जिल्हा किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित ३८ वी चिल्ड्रन, कॅडेट, ज्युनिअर व सीनियर निवड चाचणी किक बॉक्सिंग स्पर्धा १९ एप्रिल २०२६ रोजी घेण्यात आली.



अहिल्यानगर येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या स्पर्धेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. राहुरी येथील अमित किक बॉक्सिंग अकॅडमीचे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अकरा गोल्ड मेडलची कमाई केली. या मुलांची राज्यस्तरीय स्तरावर निवड झाली. महाराष्ट्र किक बॉक्सिंगचे अध्यक्ष निलेश शेलार यांनी राहुरी येथील अमित किक बॉक्सिंग अकॅडमीतील उत्कृष्ट विद्यार्थ्यांचे कौतुक केले. नितीन शेलार, जिल्ह्याचे किंग बॉक्सिंगचे अध्यक्ष सचिन मकासरे, जामखेडचे जमदाडे, नेवासा येथील

महादेव, संगमनेरचे सचिन मकासरे या सर्वांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

यामध्ये दर्शना गिरासे हिने पॉईंट फाईट मध्ये गोल्ड मेडल व शिवम पोपळघट, दिनेश जाधव यांनी पॉईंट फाईट लाईट कॉन्टॅक्टमध्ये गोल्ड मेडल तर श्लोक जाधव, आयान शेख, साद शेख उमर आतार यांनी पॉईंट फाईट मध्ये गोल्ड मेडल, तसेच मोसिन शेख याने गोल्ड मेडल पटकावीले. सदर खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करून दाखवली. त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत २२५ खेळाडूंनी नोंदवला सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :**येथे अ. नगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने साई सोशल फाउंडेशन व तुळजा फाउंडेशन आयोजित खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत श्रीरामपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, मुंबई, बीड इथून सुमारे २२५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला.





शहरातील गुजराती मंगल कार्यालयात पद्धतीने संपन्न झालेल्या या बुद्धिबळ स्पर्धे च्या शुभारंभ आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष करण ससाने, उपनगराध्यक्ष कांचनताई सानप,कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, सभापती सुधीर नवले, बाबासाहेब दिघे, सौ नीता हेमंत ओगले यावेळी उपस्थित होते.

स्पर्धेत खुल्या गटात प्रथम प्रज्वल आव्हाड द्वितीय हर्ष घाडगे तृतीय आदेश देखने तसेच मानंकन (० - १७००) गटात सोहम लांगोरे, सार्थक शिंदे यांनी क्रमांक पटकावला.

बेस्ट श्रीरामपूर तन्मय निळे, नक्ष गांधी राम दळे, बेस्ट अहिल्यानगर देवेंद्र वैद्य, बेस्ट अनरेटेड बांगर स्वराज, बेस्ट लेडी धनश्री राठी तसेच पंधरा वर्षाखालील गटात अगम मुथा, आयान चक्रबुर्ती, कावडे निशांत, भगूरकर शर्विल, जाधव निरजा यांनी क्रमांक पटकावला विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचे आयोजन शिवा काळे यांनी केले. स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी प्रवीण कुदळे, गणेश कुदळे, नारायण जांबरे, अमोल गिरमे, ऋषिकेश नवले, दिनेश वाडनकर आदींनी परिश्रम घेतले.

# हक्काच्या पाण्यासाठी जागरूकता आवश्यक : आ. हेमंत ओगले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** हक्काचे पाणी मिळवण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहणे अत्यावश्यक असून, पाण्याच्या मागणीसाठी नमुना क्रमांक ७ भरून देणे गरजेचे आहे. अन्यथा आपले पाणी आपल्या डोळ्यासमोरून वाहून जाईल, असे प्रतिपादन आमदार हेमंत ओगले यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यानिमित्त बेलापूर येथे आमदार ओगले यांच्या हस्ते प्रवरा नदीचे जलपूजन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, माजी सभापती बाबासाहेब दिघे, बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना करण ससाणे यांनी जलसंपदा विभागाच्या गोदावरी ते नर्मदा उपक्रमाचे कौतुक करत, धरणातील पाणीसाठा लक्षात घेऊन शेती व पिण्यासाठी नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी केल्याचे सांगितले. सचिन गुजर यांनी प्रवरानदीतील वाढत्या प्रदूषणाकडे लक्ष वेधत जलव्यवस्थापन आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमात गंगा कलश पूजनही करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेत सहभाग नोंदविण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या 'ज्ञानभारतम्' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिम १६ मार्च २०२६ पासून सुरु आहे, नागरिकांकडे असलेल्या हस्तलिखितांची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲपवर अपलोड करुन राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारित होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था,संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खासगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधित संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे.

# गहिनीनाथ गैबीपीर बाबाच्या यात्रेची कुस्त्याच्या हागाम्याने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा -** नेवासा तालुक्यातील माळीचिंचोरा येथील गहिनीनाथ गैबीपीर बाबांच्या यात्रा उत्सवाची जंगी कुस्त्यांच्या आखाड्याने सांगता करण्यात आली या आखाड्यात अंतिम कुस्तीच्या विजेत्या पहिलवानास २१ हजार रुपये इनाम व मानाची गदा देण्यात आली



माळीचिंचोरा येथील कुस्त्याच्या आखाड्यात शेवटच्या कुस्ती विजेत्या पहिलवानास मानाची गदा देताना ग्रामस्त ( छाया - सोपान भगत)

माळीचिंचोरा येथील हिंदू मुस्लिम तसेच सर्व धर्मीयांचे ग्रामदैवत गहिनीनाथ गैबी पीर बाबाच्या यात्रा उत्सवाच ग्रामस्थ तसेच यात्रा कमिटी कडून दरवर्षी भव्य आयोजन करण्यात आलं होतं यात कावड मिरवणूक छबिना, संदल, देवाच्या हजेऱ्या, तमाशा तसेच कुस्तीचा हगामा, अशा प्रकारे विविध धार्मिक तसेच मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. येथील असलेली संदल मिरवणूक कावड मिरवणूक छबिना मिरवणूक या सर्व मिरवणुकीत विशेष करून महिलांची गर्दी लक्षणीय असल्याने जवळपास या मिरवणुकीमध्ये पाच ते सात हजार भाविकांची गर्दी मिरवणुकीसाठी झाली होती नेवासा तालुक्यात गंगेवरून आणलेल्या पाण्याच्या कावडीची सर्वाधिक जास्त संख्या माळीचिंचोरा या गावची असल्याची परंपरा आहे आणि ती परंपरा याही वर्षी ग्रामस्थांनी कायम ठेवली. हा यात्रा उत्सव सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यात्रा कमिटीचे अध्यक्ष नितीन अहिरे, तुकाराम शेंडे, अ‍ॅड. बापूसाहेब चिंधे, मयुर शेंडे,सतीश महाराज देव्हारे, अशोक चिंधे, पहिलवान संजय पुंड, शिवाजी देव्हारे ,हसन भाई सय्यद, गणेश चौधरी, अरुण तांबे, राहुल वाघमारे यांनी परिश्रम घेतले तर यात्रा उत्सवा दरम्यान नेवाशाचे पोलीस निरीक्षक सागर ढीकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संजय माने, रामचंद्र वैद्य यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता त्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# चाँदखावली बाबांच्या यात्रौत्सवाची जंगी कुस्त्यांच्या हगाम्याने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा येथील सातशे वर्षांची परंपरा असलेला नवनाथ सांप्रदायातील अवतार चाँदखावली बाबांचा तीन दिवसीय यात्रेचा कुस्त्यांच्या जंगी हगाऱ्याने सांगता झाली. यात्रा काळात हजारो भाविकांनी गर्दी केली होती.



दरवर्षी अक्षय तृतीयेनंतर येणाऱ्या पहिल्या गुरुवारपासून चाँदखावली बाबांच्या यात्रेला प्रारंभ होत असतो. त्यानुसार गुरुवार यात्रौत्सव सुरू झाला. सायंकाळी सहा वाजता गंगेहून आणलेल्या कावडीची फटाक्यांच्या आतिषबाजीत सवादय मिरवणुक होऊन बाबांना चंदनऊटी लावत महाजलाभिषेक करण्यात आला. शुकवार यात्रेच्या मुख्य दिवशी सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. नवसाला पावणारे बाबा अशी ख्याती परिसरात असल्याने अनेकांनी नवसपूर्ती केली. भाविकांनी सकाळपासूनच मलिदा, शेरणी, चादर बाबांना अर्पण करत मनोभावे दर्शन घेतले. सायंकाळी विविध संघटना मंडळे यांनी वाजतगाजत चांदरमिरवणूक करत अर्पण केली.

समस्त ग्रामस्थ व यात्रा कमिटीच्या वतीने सायंकाळी सात वाजता मानाची चादर फटाक्यांच्या आतिषबाजीत डिजेच्या तालावर वाजतगाजत मिरवणूकीने आणत बाबांना सोनई पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल मोरे यांच्यासह यात्रा कमिटीच्या वतीने अर्पण करण्यात आली. त्यानंतर संदल व छबिना मिरवणूक पार पडली. काल शनिवार चा दिवस माता भगिनींनी दुपारी चारनंतर खरेदीसाठी मोठी गर्दी केली होती. ती रात्री उशिरापर्यंत सुरू होती. दुपारी चार वाजता जंगी कुस्त्यांचा हगामा झाला. यामध्ये महिला कुस्तीपटूंसह नामवंत मल्लानी भाग घेतला. मानाच्या कुस्तीने हगाम्याची सांगता झाली. रात्री मोफत लोकनाटय तमाशाचा कार्यक्रम झाला. सोनई पोलिस स्टेशनचे सपोनि अनिल मोरे व त्यांच्या टिमने चोख बंदोबस्त ठेवला. कोरोनानंतर प्रथमच यात्रेत सांस्कृतिक मनोरंजनाचे, कुस्त्यांचा हगामा हे कार्यक्रम प्रथमच झाले. यात्रा कमिटीनेही सुयोग्य नियोजन केल्याने यात्रेत गर्दी पहायला मिळाली.

देविदास चौरे
चांदा

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# बागेश्वर व संजय गायकवाड यांचा जोडे मारो आंदोलन करत जाहीर निषेध




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संपूर्ण विश्वाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या तथाकथित भोंदूबाबा बागेश्वर व शिंदे सेनेचा आमदार संजय गायकवाड यांचा तीव्र निषेध करत संगमनेर मध्ये हजारो नागरिकांनी एकत्र येऊन त्यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन केले.

संगमनेर मधील सर्व पुरोगामी संघटना व मी संगमनेरकर यांच्या वतीने बागेश्वर उर्फ धीरेंद्र शास्त्री व शिंदे सेनेचा आ. संजय गायकवाड यांचा जोडे मारो आंदोलन करत तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी डॉ.सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे,युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात,शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, अनिकेत घुले, निखिल पापडेजा,वैष्णव मुर्तडक, सुभाष सांगळे, विजय पवार, रामेश्वर पानसरे,राम अरगडे, विजय उदावंत, अशोक सातपुते, आकाश कडलग, बाबासाहेब गायकर, तात्याराम कुटे यांच्यासह विविध पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा येथे त्यांना अभिवादन करण्यात आले. महाराजांचा जयघोष केल्यानंतर तथाकथित महाराज धीरेंद्र शास्त्री व शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या बेताल वक्तव्याचा सर्व तरुणांनी जाहीर निषेध केला. दरिंदर शास्त्री व बेताल संजय गायकवाड यांचा जाहीर निषेध असो अशा घोषणा दिल्या.यावेळी जोडे मारो व त्यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

महाराजांबद्दल चुकीचे वक्तव्य करत असताना त्या व्यासपीठावर आरएसएस आणि महायुतीचे मोठे नेते उपस्थित होते. अशा वेळी त्यांनी एक शब्दही बोलू नये हे अत्यंत दुर्दैवी आहे. महाराजांच्या महाराष्ट्रात आशा वक्तव्यांना माफी नाही. असे सांगताना छत्रपती शिवाजी महाराजांचा समतेचा विचार घराघरात पोहोचवण्यासाठी युवकांनी काम करावे असे आवाहन जयश्रीताई तांबे यांनी केले. तर मा.आ.डॉ.तांबे म्हणाले की, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचा सुभेदार असलेल्या संजय गायकवाड यांचा राजीनामा घ्यायला पाहिजे.वाचन नाही कोणतीही माहिती नाही. असे असताना महाराष्ट्रामध्ये द्वेषभावना वाढीस लावण्याचे काम ही मंडळी करत आहे.

यावेळी बागेश्वर व संजय गायकवाड यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. या निषेध मोर्चासाठी संगमनेर मधील सर्व पुरोगामी संघटना,राजकीय संघटना,सेवाभावी संघटना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, आरपीआय, दलित पँथर, सत्यशोधक विचार मंच, छात्र भारती विद्यार्थी सेना, महिला काँग्रेस, कम्युनिस्ट पक्ष, यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द•ख•ल

### जिद्दीचा विजय! शांत्वन अमोलिक यांची एसआरएफमध्ये निवड

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील शांतवन योसेफ अमोलिक यांची एस आर पीएफ दलात निवड झाली आहे. शांतवन अमोलिक व मित्र मंडळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोर अभिवादन केले. यावेळी सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. हरेगाव परिसरासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब म्हणजे येथील होतकरू युवक शांत्वन योसेफ अमोलिक यांची जिद्दीमुळे राज्य राखीव पोलीस दलात निवड झाली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानता, जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर शांत्वन यांनी हे यश संपादन केले. शारीरिक तसेच लेखी परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत त्यांनी आपल्या क्षमतेची छाप पाडली.त्यांच्या या यशामुळे कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच संपूर्ण हरेगाव परिसरात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### आरती बोडखे चे चित्रकला स्पर्धेत यश




**टाकळीभान** : लेट एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील इयत्ता दहावीच्या वर्गातील विद्यार्थीनि आरती गणेश बोडखे हिने गुरुवर्य बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्था अंतर्गत होणाऱ्या महिला दिनानिमित्त चित्रकला स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्या परीक्षेमध्ये आरती बोडखे हिने विशेष प्राविण्य ट्रॉफी व सन्मानपत्रक मिळविले. तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ड. भाऊसाहेब टेमक व ड. सुरेखा टेमक , शाळेच्या प्राचार्या भारती कुदळे सुपरवायझर महेश शिंदे, राजेंद्र गुजर व सर्व शिक्षक यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

### दि. १ मे ला सिंगींग स्टार्स महाअंतिम फेरी




**शिर्डी** : ग्लोबल साई रिदम इव्हेंट शिर्डी आणि श्री साई हरिथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सिंगिंग स्टार्स – शिर्डी या राज्यस्तरीय हिंदी व मराठी चित्रपट गीतांच्या गायन स्पर्धेची महाअंतिम फेरी १ मे रोजी पार पडणार आहे. या स्पर्धेसाठी राज्यभरातून अनेक गुणी व प्रतिभावान गायकांनी सहभाग नोंदवला होता. प्राथमिक फेऱ्यांमधून निवड प्रक्रियेनंतर १० उत्कृष्ट गायकांनी अंतिम फेरीत स्थान मिळवले असून त्यांच्यातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकासाठी चुरस रंगणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. विजेत्यांना रोख रक्कम सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व गायकांना प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

### कोल्हारच्या जिल्हा बँक शाखेत सोनेतारण कर्ज सुविधा सुरु

**कोल्हार** : कोल्हार भगवतीपुर येथील अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेमध्ये सोने तारण कर्ज सुविधा सुरू झाली असल्याची माहिती असल्याची माहिती जिल्हा बँकेचे कोल्हार भगवतीपुर शाखेचे शाखा अधिकारी केशव रावसाहेब मोरे यांनी दिली. प्रति तोळा जास्तीत जास्त कर्ज तसेच कमीत कमी व्याज दरात सोनेतारण सुविधा खातेदारांना उपलब्ध असून कोणतेही छुपे चार्जेस यासाठी लागणार नाही कमीत कमी कागदपत्रात खातेदारांना ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल कमीत कमी व्याजदर सोनेतारण कर्ज दिले जात असून असून नियमित कर्ज भरणाऱ्या साठी एक टक्का व्याजात सूट दिली जाणार असल्याचेही मोरे यांनी सांगितले राहता तालुक्यातील कोल्हार प्रवरानगर लोणी बुद्रुक लोणी खुर्द दाढ राहता शिर्डी पुणतांबा या ठिकाणी असलेल्या जिल्हा सहकारी बँकेत ही सुविधा सुरू झाली असल्याचेही मोरे यांनी सांगितले कोल्हार येथील सुप्रसिद्ध सराफ डॉक्टर श्रीकांत बेंद्रे यांची जिल्हा बँकेचे गोल्ड व्हॅल्युवर म्हणून नेमणूक करण्यात आली असल्याचेही मोरे यांनी सांगितले. या सोने तारण कर्जाचा खातेदारांनी लाभ घ्यावा असे आवाहन शाखा अधिकारी मोरे यांनी केले आहे.

# जलसंपदा विभागाच्या फ्लेक्सबाजीमुळे संगमनेरात अपघातांना निमंत्रण

## रस्त्याच्या मधोमध कमानी; नागरिक संतप्त



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : जलसंपदा विभाग हा मुळात सिव्हिल इंजिनिअरिंग, पाण्याचे नियोजन आणि सिंचनाशी संबंधित विभाग आहे. मात्र, सध्याच्या महायुती सरकारने या विभागाचेही 'धार्मिकीकरण' सुरू केल्याचा आरोप होत आहे. संगमनेर शहरात नाशिक-पुणे हायवेवर इव्हेंटबाजीसाठी रस्त्याच्या मधोमध धोकादायक कमानी उभ्या केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून, यामुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे. महायुती सरकारच्या वतीने जलसंपदा विभागाच्या माध्यमातून शहरात ठिकठिकाणी कमानी लावण्यात आल्या आहेत. या कमानींचे नियोजन इतके चुकीचे आहे की, त्या थेट मुख्य रस्त्याच्या मधोमध आल्या आहेत.

शनिवार हा संगमनेरचा बाजारचा दिवस असल्याने शहरात प्रचंड वर्दळ असते. महाविद्यालयीन विद्यार्थी, नोकरदार आणि महिलांना या अडथळ्यांमुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या कमानींमुळे आधीच दोन-तीन किरकोळ अपघात झाले असून, एखाद्या मोठ्या दुर्घटनेची प्रशासन वाट पाहत आहे का? असा सवाल विचारला जात आहे. प्रशासन हे जनतेच्या सेवेसाठी असते, मात्र सध्याचे प्रशासन केवळ सत्ताधारी राजकारण्यांची सोय पाहण्यात मग्न आहे, अशी टीका छात्र भारतीचे प्रदेशाध्यक्ष अनिकेत घुले यांनी केली आहे. ते पुढे म्हणाले की, धर्म आणि विकास यांची गल्लत झाल्यामुळेच आज प्रगती खुंटली आहे. जनतेच्या करातून मिळणाऱ्या पैशांची ही इव्हेंटबाजी आणि उधळपट्टी संगमनेरची जनता कदापि सहन करणार नाही.

इंजिनिअरिंगच्या जोरावर चालणाऱ्या विभागात अशा प्रकारे धार्मिकीकरणाची जाहिरातबाजी करणे हे दुर्दैवी असून, तातडीने हे अडथळे दूर न केल्यास जनक्षोभ उसळण्याची शक्यता आहे.

# शेताचा बांध व जुन्या सरकारी खुणा नष्ट केल्याने तहसीलदारांची कार्यवाही

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

नेवासा : तालुक्यातील खेडले काजळी येथील शेतकरी संदीप महादेव ढगे यांनी सरकारी हद्दीच्या खुणा नष्ट करण्यासाठी जेसीबीचा वापर केला त्यांनी बांध नष्ट केला म्हणून ढगे यांच्यावर तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांनी दंडात्मक कार्यवाही केली असे पत्र ही त्यांनी प्रसार माध्यमांना दिले आहे. सदर आदेश पत्रात म्हटले आहे की, संदिप ढगे यांनी बांधावरील तीन लिंबाची झाडे जेसीबीच्या सहायाने तोडले त्यामुळे नेवासा मान्य तहसीलदार तथा दंडाधिकारी यांनी त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाहीचा हिसका दाखवला आहे संदीप ढगे यांनी वडिलोपार्जित जुना निश्चित केलेल्या बांधाच्या सरकारी खुणा नष्ट केल्या तसेच त्यांनी लिंबाची झाडे तोडली. त्याबद्दल त्यांच्यावर तहसीलदार तथा दंडाधिकारी नेवासा यांनी कार्यवाही करून सात दिवसात दंड जमा न केल्यास पुढील कार्यवाही करण्याचा ईशारा दिला आहे. शेतकरी बंधूंनी सहकार्याने व प्रेमाने राहण्याचा गर्भित संदेश तहसीलदार डॉ संजय बिरादार यांनी या कारवाईद्वारे कृतीतून दिला आहे.

# आढळा डाव्या कालव्याला पाणी सोडले ; शेतकऱ्यांना दिलासा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : आढळा लाभ क्षेत्रात येणाऱ्या संगमनेर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाण्याअभावी शेतपिके करपण्याच्या मार्गावर आली होती. याबाबत चिकणी येथील ग्रामस्थांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिल्यानंतर आढळा डाव्या कालव्याला पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आढळा लाभ क्षेत्रातील अनेक गावांमध्ये सध्या तीव्र उष्णतेमुळे पिकांची अवस्था बिकट झाली होती. पाण्याअभावी पिके वाळत असल्याने शेतकरी चिंतेत होते. विशेषतः चिकणी आणि वडगाव लांडगा परिसरातील शेतकऱ्यांनी पिके वाचवण्यासाठी तातडीने कालव्याला पाणी सोडण्याची मागणी केली होती. दरम्यान, गोदा ते नर्मदा जलयात्रा आश्वी परिसरात असताना आमदार खताळ यांनी ही गंभीर बाब जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मंत्री विखे पाटील यांनी तत्काळ आढळा डाव्या कालव्याला पाणी सोडण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यानंतर जलसंपदा विभागाने तातडीने कार्यवाही करत आढळा धरणाच्या डाव्या कालव्याला पाणी सोडले. कालव्याला पाणी मिळाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून पिकांना जीवदान मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. अमोल खताळ यांचे आभार मानले आहेत.

# नाशिकमध्ये ना. आठवले यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन

## ब्राह्मणे यांची 'घरवापसी'



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहुरी तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकारणाला नवे वळण देणारी घडामोड नाशिक येथे घडली.

रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत राजन ब्राह्मणे यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) मध्ये पुनरागमन केले. या पक्षप्रवेशामुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणे ढवळून निघाली असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हालचालींना वेग आला आहे.

राजन ब्राह्मणे यांचा राजकीय प्रवास आरपीआयमधूनच सुरू झाला होता. राहुरी तालुक्यात ते आठवले यांचे विश्वासू व निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. संघटन उभारणीत त्यांनी सातत्याने काम करत स्थानिक पातळीवर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. समाजातील वंचित घटकांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याच्या उद्देशाने पुन्हा पक्षात प्रवेश केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला पक्षाचे संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव, जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, भाऊसाहेब पगारे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ब्राह्मणे यांच्या पुनरागमनाचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. या प्रवेशामुळे राहुरी तालुका व अहिल्यानगर जिल्ह्यातील आरपीआय संघटनेला बळकटी मिळणार असल्याचे मानले जात आहे. तसेच आगामी निवडणुकांमध्ये या घडामोडींचा परिणाम दिसून येण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. यावेळी संतोष ब्राह्मणे, आकाश गोंडगे, निसर पठाण, विजयराव जाधव, महेश सुरडकर यांच्यासह अनेकांनी पक्षप्रवेश केला. कार्यक्रमास विविध तालुक्यांतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीरामपूरात जलयात्रेचे भव्य स्वागत

## जलसंवर्धनाचा संदेश गाजला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरात आज जलसंवर्धनाचा प्रभावी संदेश देणाऱ्या 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६'चे अत्यंत भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. संपूर्ण शहरात या यात्रेच्या स्वागतासाठी मोठी तयारी करण्यात आली होती. ठिकठिकाणी स्वागत कमानी, फलक, फुलांची सजावट आणि घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या जलजागृती यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जामखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र चौंडी येथून प्रारंभ झालेली ही जलयात्रा राज्यभर प्रवास करत असून, जलसंवर्धनाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करत आहे. श्रीरामपूरमध्ये आगमन होताच यात्रेचे हनुमान मंदिर परिसरात पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात, फुलांच्या वर्षावात आणि जलसंवर्धनाच्या घोषणांनी वातावरण दणाणून गेले. यावेळी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी उपस्थितांसह आरती करून यात्रेचे स्वागत केले. यानंतर यात्रेने शहरातील विविध धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेट दिली.




शिवसृष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक तसेच गुरुद्वार येथे दर्शन घेण्यात आले. प्रत्येक ठिकाणी यात्रेचा सन्मान करण्यात आला आणि जलसंवर्धनाचा संदेश देण्यात आला. या स्वागत सोहळ्यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर तसेच भाजप नेते संजय फंड, गटनेत्या वैशाली चव्हाण, नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, सिद्धार्थ फंड, दिपक चव्हाण, मा नगराध्यक्षा अनुराधा आदिक, संजय छल्लारे, बंडुकुमार शिंदे, भाजपचे उपजिल्हाध्यक्ष दिपक पटारे, भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, मा. नगराध्यक्ष संजय फंड, नाना शिंदे, पक्षप्रतोत वैशाली चव्हाण, नगरसेवक संजय गांगड,रवी पाटील, आशिष धनवटे, मनोज लबडे ,तिलक डुंगरवाल, केतन खोरे, शरद नवले, डॉ शंकर मुठे, भीमराज बागुल, नगरसेवक सिद्धार्थ फंड, रुपेश हरकल आदींसह महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी या यात्रेचे उत्साहात स्वागत केले, महिलांची आणि युवकांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली.

दरम्यान, या जलयात्रेचा पुढील मुक्काम शिर्डी येथे असणार असून, त्र्यंबकेश्वर येथून आलेल्या दुसऱ्या यात्रेसोबत एकत्रितपणे ही यात्रा पुढे घृष्णेश्वरकडे प्रस्थान करणार आहे. या यात्रेचा समारोप महेश्वर येथे होणार असून, त्याठिकाणी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# बौद्ध लेण्या धम्माचा वारसा सांगणाऱ्या : अनिल मुन्तोडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**आश्वी** : भारतात सर्वदूर पसरलेल्या बौद्ध लेणी धम्माचे सर्वोच्च ज्ञानकेंद्र असून, आपल्या पूर्वजांनी केलेल्या दानाचा जगातील अतुलनीय वारसा सांगणाऱ्या आहेत, असे प्रतिपादन अनिल मुन्तोडे यांनी केले. मुन्तोडे म्हणाले, भारतीय लोकांनी आपल्या पूर्वजांनी केलेल्या या ऐतिहासिक कार्याबद्दल नेहमीच आभारी राहिले पाहिजे. आश्वी खुर्द येथील बौद्धाचार्य श्रामणेर शिबिरासाठी नाशिक येथील प्रसिद्ध त्रिरश्मी लेणी येथे अभ्यास दौऱ्यात मार्गदर्शन करताना अनिल मुन्तोडे यांनी ही मते व्यक्त केली.

सकाळी सहा वाजल्यापासून भिक्खू संघाचा त्रिरश्मी लेणी परिसरात एकदिवसीय अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. लेणी परिसरात धम्म लिपीतील शिलालेख, चैत्य, स्तूप याबाबत सविस्तर कार्यशाळा घेण्यात आली. सकाळी साधना मुन्तोडे यांनी संघाला नाश्ता दान दिला. तर नाशिक येथील ट्रिलँड पार्क येथे यादव खरात यांच्या परिवारातर्फे भिक्खू संघाला भोजन दान देण्यात आले.

संघाचे पर्यटन व्यवस्थापन बौद्धाचार्य सुशिल मुन्तोडे यांनी केले. त्यांना तन्वी मुन्तोडे, श्रेया मुन्तोडे व हर्षल पवार यांनी उत्कृष्ट साथ दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सागर खरात, दिलीप खरात, अमोल खरात, प्रकाश खरात, सार्थक खरात, समीर खरात,विहान खरात,अलका खरात व अमृता खरात यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### जुने महसूल कायदे बदलून प्रशासन लोकाभिमुख करणार

महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. अधिकाऱ्यांनी त्यांच्याच स्तरावर नागरिकांचे प्रश्न सोडवले तर लोकांना मंत्रालयात येण्याची वेळ येणार नाही. महसुली प्रकरणांच्या सुनावणीत तारखांवर तारखा न देता केवळ दोन तारखांमध्ये निर्णय घेण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. दुसऱ्या तारखेला लेखी युक्तिवाद न आल्यास एकतर्फी आदेश काढले जातील, असे त्यांनी सांगितले. नागरिकांची कामे वेळेत व्हावीत यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. अधिकाऱ्यांकडे जाऊनही काम पूर्ण न झाल्यास नागरिकांनी माझ्या व्हॉट्सॲप क्रमांकावर स्वतःचे नाव व कामाचा तपशील पाठवावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, नागरिकांचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. अकृषिक परवानगी, वाळू धोरण, शेतरस्ते व तुकडेबंदी कायद्याबाबत शासनाने घेतलेल्या लोकोपयोगी निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात केली जात आहे. राज्याच्या व देशाच्या आर्थिक प्रगतीत महसूल तसेच भूमी अभिलेख विभागाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. वर्ष २०४७ पर्यंत देशाला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या ध्येयपूर्तीसाठी शासकीय यंत्रणा काम करत आहे. या संकल्पासाठी गाव पातळीवरील कोतवाल, तलाठी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वजण प्रयत्नशील आहेत. नागरिकांच्या अडीअडचणी शक्यतो जिल्हा पातळीवरच सोडवल्या जातील व आवश्यकतेनुसार कायद्यात किंवा शासन निर्णयात बदल करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात श्री. कोळेकर यांनी महसूल विभागाची अकृषिक परवानगी कायद्यातून रद्द करणे, घरांसाठीची तुकडे खरेदी विना-नजराणा नियमानुकूल करणे, ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर कौटुंबिक वाटपपत्राची नोंदणी करणे, सातबारा उताऱ्यावरील कालबाह्य नोंदी वगळणे व 'बळीराजा शेत पाणंद योजने'तून कृषी विकासाला चालना देणारे धोरण या ऐतिहासिक निर्णयांबद्दल माहिती दिली. यावेळी महसूलमंत्र्यांनी दोनशेहून अधिक नागरिकांची निवेदने प्रत्यक्ष स्वीकारली. यातील काही निवेदनांवर जागेवरच निर्णय दिला, तर काही निवेदनांचा पंधरा दिवसांच्या आत निपटारा करण्याची ग्वाही दिली. याप्रसंगी महसूलमंत्र्यांच्या हस्ते महसुली सेवांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

### धीरेंद्र शास्त्रींचा अखेर माफीनामा

शिवरायांचा अपमान भाजप सरकारच घडवून आणतंय की काय अशी शंका यायला लागली आहे. एखाद्या वेळेस आता यांना फटकावलं पण पाहिजे, आता फक्त कमेंट करून, निषेध करून आणि सोशल मीडियावरच बोलून चालणार नाही. आता हे झोडावेच लागणार आहेत मग आता शांत बसून नाही चालणार. छत्रपतींचा जर हे अवमान करत असतील तर झोडावंच लागेल. केस होईला याला कधीपर्यंत भ्यायचं? भाजप सरकारने आणि देवेंद्र फडणवीस यांनी हे लोकं थांबवले नाहीत तर एकदा झोडाझोडी होणारच आहे. गुन्हा दाखल करून काहीच होणार नाही, यांना फटके दिले तरच हे थांबणार आहेत, यांना दुसरा पर्यायच नाही.' अभिनेता रितेश देशमुखनेही बागेश्वर बाबांच्या विधानावर नाराजी व्यक्त केली होती. त्यांनी म्हटले की, शिवाजी महाराजांबद्दल वापरलेले कोणतेही अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधाने शिवप्रेमी कधीही खपवून घेणार नाहीत. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशाप्रकारचा कोणताही उल्लेख इतिहासात नाही असं विधान केलं होतं.

### मुंबई उच्च न्यायालय भरतीत 'राष्ट्रभाषा' वाद

पर्याय निवडला आहे, त्यांचे गुण सरसकट कमी करावेत आणि प्रशासनाने या चुकीबद्दल लेखी खुलासा करावा, अशी मागणी समितीने केली आहे. कठोर मेहनत घेऊन परीक्षेला बसलेल्या तरुण उमदवारांमध्ये या प्रश्नामुळे गोंधळाचे वातावरण आहे. संविधानाचा हवाला देत समितीने हा प्रश्नच बाद करण्याची मागणी लावून धरली आहे. दरम्यान, या वादावर मुंबई उच्च न्यायालय प्रशासन किंवा संबंधित परीक्षा प्राधिकरणाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

### राज्यात उष्णतेची लाट

गेल्याने नागरिक घामाघूम झाले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात दुपारच्या वेळी उष्ण वारे वाहत असल्याने नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले आहे. ग्रामीण भागात शेतीकामांवर उन्हाचा मोठा परिणाम झाला असून जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्नही गंभीर होत आहे. तिकडे पुणे शहरातही सिमेंटच्या जंगलामुळे उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे. पुणे वेधशाळेने येत्या दोन दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली असून नागरिकांना पुरेशी खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. वाढत्या उष्णतेमुळे शीतपेये आणि फळांच्या रसांच्या स्टॉल्सवर नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांत अकोल्यातील तापमानात सातत्याने वाढ होत आहे. या वाढत्या तापमानामुळे अकोला हे जगातील सर्वाधिक तापमान असलेल्या शहरांपैकी एक ठरत आहे. तेथील तापमान ४५.६ अंश सेल्सिअस वर पोहोचले आहे. जळगाव शहरात तापमान ४३ अंशांच्या पुढे गेल्याने महानगरपालिकेने शहरातील प्रमुख चौकांमध्ये टँकरद्वारे पाणी मारण्याची मोहीम राबवली आहे. महापौर दीपमाला काळे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. मुंबईत उन्हाचा तडाखा वाढला आहे. एप्रिल महिन्यातच मुंबईचा पारा ३९ अंश सेल्सिअस वर पोहचला आहे. हवामान विभागाकडून खरंतर रविवारी आणि सोमवारी मुंबई शहरात आणि मुंबईच्या लगतच्या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. यानंतर आज मुंबईत चक्क पारा ३९ अंश सेल्सियस वर पोहोचला आहे. या उन्हापासून वाचण्यासाठी मुंबईकरांनी घरी राहण्यास पसंती दिली आहे.देशातील वीज मागणीचा उच्चांक नोंदवला गेलाय.

# अनेक आंदोलनानंतरही शिवनानदी पात्रातील अवैध वाळू उपसा बंद होईना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर:** तालुक्यातील चिंचखेडा, शाहनवाजपूर, अंनतपूर, आगाठाण भागाठाण येथील शिवना नदीपात्रातून सर्रासपणे अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक होत असुन कायमस्वरूपी बंद करण्यात यावे म्हणून भालचंद डुबे यांनी अनेक वेळा तहसीलदार, जिल्हाधिकारी तसेच नदीपात्रात आत्मदहन सारखे आंदोलने केली मात्र अवैध वाळू उत्खनन काही बंद होत नसुन वाळू उपसा करणाऱ्यास संबंधित अधिकाऱ्यांचा वरदहस्त असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.



गंगापूर तालुक्यातील शाहनवाजपूर,अंनतपूर, आगाठाण भागाठाण येथील शिवना नदी पात्रातून तसेच खाजगी जमीनीतुन होत असलेली सर्रास अवैध वाळू वाहतूक बंद करून संबंधितांवर कारवाई करण्यासाठी भालचंद डुबे यांनी आंदोलन केले परंतु महसुल विभागाकडून डुबे यांना आजपर्यंत फक्त आश्वासने मिळाली मात्र वरिल गावातील शिवना नदीपात्रातून आजही अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक सुरुच असून वाळू माफीया व संबंधित महसुल अधिकारी व कर्मचाऱ्यांचे लागेबांधे असल्याने कारवाई होत नसल्याने आता कारवाई कोण करणार असा प्रश्न डुबे यांनी उपस्थित केला आहे.

गंगापूर तालुक्यातील भालगांव,मालुंजा,काटेपिंपळगांव,झोडेगांव,शिवना नदी पात्रातून अनेक ठिकाणी अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक रात्रंदिवस सुरूच असुन अवैध वाळू उपसा करणाऱ्या विरोधात अद्याप पर्यंत काहीच कारवाई करण्यात आली नसल्याने वाळु माफीयांना अभय मिळत असल्याने आतापर्यंत शासनाचा लाखो रुपयांचा महसुल बुडाला असल्याने यास जबाबदार कोण असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

तालुक्यात ठीक ठिकाणी नदीपात्रातून अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक होत असल्याबाबत संबंधितांना जबाबदार धरून त्यांच्याविरोधात शिस्त भंगाची कारवाई करुन होत असलेला अवैध वाळू उपसा कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी भालचंद्र डुबे यांच्यासह नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## प्रवराच्या आशुतोष दळेची सहाय्यक नगर रचनाकार पदी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी:** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा हायस्कूल कोल्हार या सीबीएसई बोर्डाच्या शाळेचा माजी विद्यार्थी आशुतोष रमेश दळे महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाद्वरे घेण्यात आलेल्या परीक्षेतून सहाय्यक नगर रचनाकार ( राजपत्रित) श्रेणी एक या पदावर निवड झाली आहे. अशी माहीती प्राचार्य सुधीर मोरे यांनी दिली.




आशुतोष चे शिक्षण प्रवरा हायस्कूल कोल्हार येथे झाले. सिव्हिल अभियांत्रिकी मध्ये त्याने पदवी प्राप्त केल्यानंतर एमपीएससी अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगा अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या सहाय्यक नगर रचनाकार अधिकारी पदाच्या परीक्षेची तयारी करून मेहनतीने हे यश संपादन केले. लेखी परीक्षा आणि तोंडी परीक्षेमध्ये त्याने उत्तम गुण प्राप्त केल्याने त्याची निवड झाली आहे.आशुतोष हा प्रवरेचे क्रीडाशिक्षक प्रा.रमेश दळे यांचा मुलगा आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून प्रवरा हायस्कूलने अनेक विद्यार्थी घडविले आहे. शाळेचे अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेद्वरे अधिकारी पदी कार्यरत आहे. त्यांनी मिळवलेल्या या यशा निमित्त विद्यालयाच्या वतीने त्याचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी त्याने उपस्थित विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी या विषयावर मार्गदर्शन केले.माननीय नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये अनेक विद्यार्थी तयारी करीत आहेत.

कोल्हार येथील स्पर्धा परीक्षा केंद्र प्रवरा हायस्कूल येथे चालते.विद्यार्थ्यांना ग्रंथालय सुविधा,इंटरनेट सुविधा,प्रशस्त बैठक व्यवस्था इत्यादी सुविधा या केंद्रामार्फत मोफत पुरविल्या जातात. परिसरातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा केंद्राचा लाभ घेण्याचे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य सुधीर मोरे यांनी केले आहे.

## नामस्मरण करत राहिल्यास चिंता व संकटे दूर राहतात : अरुणनाथगिरी महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव:** श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव येथे आसने वस्ती येथे आयोजित प्रवचन कार्यक्रमात श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थान भामाठाण येथील महंत स्वामी अरुणनाथगिरी महाराज यांनी भाविकांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी भगवंताच्या नामस्मरण आणि चिंतनाची महती सांगताना, नामस्मरणाने पाप-दोष नष्ट होतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते, असा उपदेश केला. महाराज म्हणाले की, जीवनात कर्माला मोठे महत्त्व आहे. माणसाने नेहमी चांगली कर्मे करावीत. भगवंत परमात्मा हा भावाचा भुकेला असतो, त्यामुळे भक्ती करताना अंतःकरण शुद्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. साधुसंतांच्या सानिध्यात राहून जीवन जगल्यास मनाला समाधान मिळते आणि जीवन अधिक अर्थपूर्ण होते. नामस्मरण, चिंतन आणि भजन यात प्रचंड शक्ती असून त्यातून मनःशांती मिळते, असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी जीवनातील कर्तव्यांची जाणीव करून देताना, आई-वडिलांना कधीही विसरू नये, संकटे आणि दुःख ही जीवनाचा भाग असतात आणि ती येतात तसेच निघूनही जातात, असे नमूद केले. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि येथे मोठ्या प्रमाणावर संत जन्माला आले, याचा अभिमान प्रत्येकाने बाळगावा, असेही त्यांनी सांगितले. सुखात सुख आणि दुःखात दुःख मानायला शिका, चांगले कर्म आणि परमार्थाचे कार्य करा, तेच कार्य भगवंतापर्यंत पोहोचते, असे त्यांनी आवर्जून सांगितले, तसेच कोणत्याही क्षेत्रात कार्य करताना प्रामाणिकपणा राखावा आणि सदैव नामस्मरण करत राहिल्यास चिंता व संकटे दूर राहतात, असा संदेश त्यांनी दिला. यावेळी ज्येष्ठ नेते गिरीधर आसने भाजपाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे लक्ष्मण आसने परसराम आसने गजानन आसने देवकिसन आसने गोरख आसने जालिंदर आसने सोमनाथ आसने ऋषिकेश आसने सुभाष आसने नानासाहेब आसने भाऊसाहेब आसने अनिल आसने बाबासाहेब आसने अण्णासाहेब आसने रावसाहेब काळे दिलीपराव हुरुळे भाजपाचे सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक पत्रकार संदीप आसने आतिश आसने सदाशिव आसने नारायण आसने सुरेश आसने पत्रकार विठ्ठलराव आसने देवदास मंतोडे श्रीकृष्ण शेळके आदि सह ग्रामस्थ मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत आत्मा मालिक गुरुकुलाचे ९२ विद्यार्थी गुणवत्ता यादित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** :- राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) परीक्षेत आत्मा मालिक माध्यमिक व उच्च माध्यमिक गुरुकुल कोकमठाण च्या विद्यार्थ्यांनी अव्वल कामगिरी केली. यंदा या शाळेचे तब्बल ९२ विद्यार्थी गुणवत्ता यादित झळकले. सलग अकराव्या वर्षी या शाळेने राज्यपातळीवरील आपला प्रथम क्रमांक कायम ठेवला. पुढील चार वर्षात या विद्यार्थ्यांना दरमहा एक हजार रूपये याप्रमाणे एकूण ४४ लाख रूपये रकमेची शिष्यवृत्ती मिळेल. अशी माहिती प्राचार्य निरंजन डांगे यांनी दिली.





ते म्हणाले, यंदा परीक्षेचे गुणवत्तेचे (मिरिट) हे आजपर्यंतचे सर्वोच्च आहे. तरीही आत्मा मालिकच्या विद्यार्थ्यांनी राज्यपातळीवरील आपला पहिल्या क्रमांक यंदाही कायम ठेवला. या परीक्षेमध्ये आत्मा मालिक माध्यमिक गुरूकुलाचे आजपर्यंत एक हजार सातशे बहात्तर विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले. त्यांनी आठ कोटी पन्नास लाख छप्पन्न हजार रूपयांची शिष्यवृत्ती मिळवली.

या विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख सचिन डांगे, अनिल सोनवणे, बाळकृष्ण दौंड, रवींद्र देठे, मिना नरवडे, रमेश कालेकर, तसेच पर्यवेक्षक गणेश रासने, नयना आदमाने, सुनील पाटील, नितीन अनाप व विषय शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले.

या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, मीरा पटेल आदिंनी अभिनंदन केले.

## निधन वार्ता

### पर्वताबाई लोखंडे



**टाकळीभान** - येथील पर्वताबाई भागवत लोखंडे वय वर्ष (८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पक्षात दोन मुले,पाच मुली व सुना-नातवंडे असा परिवार असून पत्रकार दिलीप लोखंडे,पी. आय. राजेंद्र लोखंडे, यांच्या मातोश्री होत्या, त्यांचा स्वभाव धार्मिक व मनमिळाऊ होता त्यांच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### नारायण धसाळ



**राहुरी** : तांदुळवाडी गावातील जेष्ठ नारायण आनंदा धसाळ (वय ८८) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सूना, नातवंडे, भाऊ, बहीण, पुतणे असा मोठा परिवार आहे. बाळासाहेब, रामदास, भाऊसाहेब धसाळ यांचे जेष्ठ बंधू, नामदेव, संजय व शिवाजी धसाळ यांचे वडील तर माजी ग्रा.पं.सदस्य प्रभाकर धसाळ यांचे चुलते होत.

### आसाराम ढोबळे



**श्रीरामपूर:** तालुक्यातील खैरी निमगाव येथील आसाराम मारुती ढोबळे (८२ वय) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुली दोन, सुना, नातवंडे जावई असा मोठा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते नंदू ढोबळे यांचे ते वडील होत.

### डॉ. राजेंद्र बाविस्कर



**अमरापूर** : शेवगाव येथील ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी तथा समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व डॉ. राजेंद्र हिरामण बाविस्कर यांचे निधन झाले. डॉ. बाविस्कर यांनी शेवगाव येथे मेडिकल ऑफिसर म्हणून कार्य केले. तसेच संभाजीनगर येथे डी.एच.ओ. पदावर सेवा बजावली. त्यांच्या पश्चात चिरंजीव डॉ. अश्विन बाविस्कर, जयिष्णू राजेंद्र बाविस्कर, भाऊ, पत्नी व मोठा परिवार असा परिवार आहे.

### सुशिलाबाई कुरुमकर



**लिंपणगाव :** येथील एक आदर्श माता सुशिलाबाई नारायणराव कुरुमकर पाटील (वय ९३) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर, सुभाषराव कुरुमकर, सुदामराव कुरुमकर, राजेंद्र कुरुमकर यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने पिंपळगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### भामाबाई जाधव



**पानेगांव** : राहुरी तालुक्यातील जातप येथील भामाबाई काशिनाथ जाधव यांचे दि २४ शुक्रवार अल्पशा आजाराने निधन झाले (वय ७५) त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली सुना जावई नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. प्रगतीशील शेतकरी रामदास जाधव व जातप ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण जाधव यांच्या मातोश्री होत.

# नादुरुस्त रस्त्यांमुळे ग्रामस्थांचे हाल;

## बांधकाम विभागासमोर उद्या मुक्काम आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम खात्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार फोफावला असुन तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते वर्षानुवर्ष होत नसल्याने ग्रामस्थांना चिखल तुडवत तसेच नादुरुस्त रस्त्यावरुन जिव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.एव्हढेच नव्हे तर खराब रस्त्यामुळे वांरवार छोटेमोठे अपघात घडत असताना त्याच प्रमाणे प्रसुती ग्रस्त महीलांना व आजारी रुग्णांना रुग्णालयात वेळेवर न पोहोचल्याने अनेकांना आपला जिव गमवावा लागला. रस्ते अंदाजपत्रकानुसार व मुदतीत करावे म्हणून ग्रामस्थांना लोकशाही मार्गाने आंदोलनांचे हत्यार उपसावे लागत हे दुर्दैव आहे.



संबंधित बांधकाम विभाग व ठेकेदारांच्या संगनमताने सुरू असलेल्या रस्त्याच्या कामात अनियमितता असल्याचे पाहावयास मिळत आहे. मात्र बांधकाम विभाग भ्रष्टाचारात अग्रेसर असतांना ही ग्रामीण भागातील रस्त्यांकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्षामुळे रस्ते ओस पडल्याचे ग्रामस्थांमधून बोलले जात आहे.

गंगापूर तालुक्यातील मालुंजा बु. ते जिकठाण फाटा (चूठ-६४) १८ किलोमीटर या मुख्य रस्त्याच्या कामासाठी ६ कोटी ९८ लक्ष रुपये मंजूर असुन सदरचे काम बांधकाम विभागाने हाती घेऊन काम सुरू होऊन जवळपास एक वर्ष होत आले एव्हढ्या मोठ्या प्रमाणात या रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर असताना देखील ठेकेदाराने केवळ हा डांबरी रस्ता खोदून अर्धवट सोडले एवढेच नव्हे तर झालेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असुन रस्त्याचे काम अर्धवट असल्याने वाहनधारकांना येण्या जाण्यासाठी मोठा अडचणीचा सामना करावा लागत आहे.

सदरचे काम तत्काळ सुरू करुन काम अंदाजपत्रकानुसार करण्याच्या मागणीसाठी कनकोरी येथील सामाजिक कार्यकर्ते वाल्मीक पवारसह ग्रामस्थ गंगापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समोर २७ एप्रिल रोजी मुक्काम अंदोलन करणार आहे.

गंगापूर तालुक्यातील या रोडवरिल स्लॅब ड्रेन पुलांच्या कामात मोठी अनियमितता झाले असून डांबरी रोड खोदून ठेवला काम बंद ठेवण्यात आले यारोडवर ४ स्लॅब ड्रेन पुलांचे काम हाती घेण्यात आले मात्र, प्रत्यक्षात केवळ २ पुलांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित २ पुलांचे काम अद्याप थांबलेले आहे,

प्रत्यक्षात काम ५०% अपूर्ण असताना आणि मुदत संपलेली असतानाही ठेकेदारास कंत्राटदाराला मोठ्या प्रमाणात बिल अदा करण्यात आले आहे. जोपर्यंत मालुंजा बु. ते जिकठाण रस्त्याचे व पुलाचे काम अंदाजपत्रकानुसार करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते वाल्मीक पवारसह ग्रामस्थ बांधकाम विभागासमोर मुक्काम आंदोलन करणार असुन जोपर्यंत काम सुरू होत नाही तोपर्यंत मुक्काम अंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशारा वाल्मिक पवार यांनी दिला आहे.


## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि .२७ एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१२९ ४८० २२८ | २-६ | १५० १६९ ११४

जोड ५७-४१-९० ३६-१८

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१२० ६७० ५८० | ३-७ | १२४ ४६७ १००

जोड १३-८०-२४-३७-०९

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

१२४ ४६७ ७०० | ७-२ | १५४ १२४ ११०

जोड ७४-१२-३५ ९८-२३

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल

# वरात नाही, समाजसेवेची वाट

## तहसीलदार आकाश दहाडदे यांच्या विवाहातून आदर्शाची वाट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : आजच्या काळात विवाहसोहळा म्हणजे दिखावा, खर्चिक प्रथा आणि स्पर्धेचा विषय बनत चालला आहे. प्री-वेडिंग शूट, डीजे, भव्य मिरवणुका, हार-फेटे, वरात आणि लाखोंचा खर्चहे जणू लग्नाचे नवे परिमाण झाले आहे. मात्र, या सगळ्या दिखाव्याला जाणीवपूर्वक नकार देत शेवगावचे तहसीलदार आकाश दहाडदे यांनी आपल्या विवाहातून समाजाला एक संदेश दिला आहे.


दि. २१ एप्रिल २०२६ रोजी आकाश दहाडदे यांचा विवाह डॉ. सोनल साबळे यांच्याशी अत्यंत साधेपणाने आणि सामाजिक बांधिलकी जपत पार पडला. या विवाहात कोणतीही अनावश्यक दिखाऊ परंपरा न ठेवता, त्या खर्चातून समाजासाठी काहीतरी करण्याचा निर्णय दहाडदे आणि साबळे परिवाराने घेतला.

या निर्णयामागे दहाडदे कुटुंबाचा संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवास दडलेला आहे. तहसीलदार आकाश दहाडदे यांचे वडील सुरुवातीच्या काळात संसार उभा करण्यासाठी रिक्षा चालविणे, पेट्रोल पंपावर काम करणे अशी अनेक छोटी-मोठी कामे करत होते. कष्ट, चिकाटी आणि प्रामाणिकपणाच्या बळावर त्यांनी पुढे बेदाणा उत्पादन क्षेत्रात मोठे यश मिळवले आणि पंचक्रोशीत एक यशस्वी बेदाणा उत्पादक म्हणून नाव कमावले.

त्या कष्टातून रुजलेल्या संस्कारांचीच ही पुढची पायरी ठरली. उपमुख्याधिकारी धनंजय राजाराम दहाडदे यांनी सांगितले की, माझे बंधू आकाश दहाडदे यांच्या विवाहानिमित्त आम्ही दोन्ही परिवारांनी खर्चिक प्रथांना फाटा देत सामाजिक कार्यासाठी हातभार लावण्याचे ठरवले. ही रक्कम फक्त देणगी नसून समाजाप्रती आमची कृतज्ञता आहे.

या अनुषंगाने डॉ. धामणे साहेब यांच्या माऊली प्रतिष्ठान या संस्थेला दहाडदे परिवारातर्फे रु. १ लाख ५१ हजारांची मदत देण्यात आली. तसेच श्री साई विठ्ठल अनाथ आश्रम यांना साबळे परिवारातर्फे रु. १ लाख ११ हजारांची रक्कम अर्पण करण्यात आली.

लग्नाच्या आनंदाला समाजसेवेची जोड देत दोन कुटुंबांनी उभा केलेला हा आदर्श आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.





### अनामप्रेम मधील दिव्यांग विद्यार्थ्यांना अन्न-धान्याची भेट

**अहिल्यानगर** : स्नेहालय संचलित अनामप्रेम संस्थेत महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्कार प्राप्त सुनिल सकट व सौ. वंदना सुनिल सकट यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अन्न-धान्याची भेट देत सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून त्यांच्याशी संवाद साधत त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमावेळी संस्थेचे प्रतिनिधी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले, समाजातील गरजू घटकांप्रती संवेदनशीलता जपण्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला. यावेळी बोलताना सुनिल सकट म्हणाले की,समाजात अनेक घटक असे आहेत जे मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करत आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थांना सहकार्य करणे ही केवळ मदत नसून आपली सामाजिक जबाबदारी आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मिळतो आणि त्यांना पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. भविष्यातही अशा सामाजिक कार्यात सातत्य ठेवणार असून अधिकाधिक लोकांनी या कार्यात सहभागी व्हावे, ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### शिष्यवृत्ती परीक्षा विविध केंद्रांवर सुरळीत



**शेवगाव** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेली चौथी व सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा रविवारी ( दि. २६ ) तालुक्यात विविध केंद्रावर सुरळीतपणे पार पडली. एकूण ४ हजार ५० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. वाढलेले ऊन आणि परीक्षा केंद्र यामधील अंतर लक्षात घेता विद्यार्थ्यांची अडचण होऊ नये यासाठी परीक्षा केंद्राची संख्या वाढविण्यात आली होती. या वर्षी पाचवी ते आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा झाली. त्याचबरोबर शासनाने चौथी व सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ही परीक्षा घेण्यात आली. चौथी शिष्यवृत्ती परीक्षा तालुक्यातील ३५ केंद्रावर घेण्यात आली. त्यात ३०९१ प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी २९९० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर सातवी शिष्यवृत्ती परीक्षा तालुक्यातील १० केंद्रावर घेण्यात आली. त्यात १०२३ प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी १०६० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांनी शहरातील तसेच तालुक्यातील विविध परीक्षा केंद्राला भेटी देत आढावा घेतला. शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर, केंद्रप्रमुख रघुनाथ लबडे, विष्णू गायकवाड, नामदेव धायतडक, विशेष शिक्षक दत्ता सुरवसे यांनी परिक्षेच्या नियोजनासाठी सहकार्य केले.

### नामदेव पतंगे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**अहिल्यानगर** : नेवासा तालुक्यातील वडाळा मिशन येथील ओ.सी.पी.एम. स्कूलचे मुख्याध्यापक नामदेव राजाराम पतंगे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. शिक्षण क्षेत्रात तब्बल ४० वर्षे दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा मानपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी मिशनचे सचिव डी. जी. भांबळ उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील व मराठी मिशनच्या अध्यक्षा विजयाताई जाधव उपस्थित होते. यावेळी ललित दादा मोटे पाटील (सरपंच, वडाळा बहिरोबा), दिलीपराव मोटे पाटील (चेअरमन, जाणता राजा पतसंस्था ), विठ्ठल उरमुडे, भास्कर नरसाळे, सुनिल नरसाळे (केंद्रप्रमुख), ज्ञानेश चव्हाण (सचिव रे.शि.प्र. मंडळ), नितीन घाडगे (सहसचिव रे.शि.प्र. मंडळ), रंगनाथ बोबडे (मुख्य ध्यापक रे.शि. प्र.म. प्राथ विद्यालय) आदी मान्यवर उपस्थित होते.

### महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात
## प्रा.भुजबळ यांचा सेवापूर्ती कृतज्ञता समारंभ



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील ज्युनिअर विभागाचे इतिहास विषयाचे प्रा. रमेश भुजबळ यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा संपन्न झाला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडीचे सदस्य बाबासाहेब भोस होते. ते म्हणाले की, प्रा.रमेश भुजबळ यांनी उत्तम सेवा केली आहे. रयत शिक्षण संस्थेची बांधिलकी जोपासणारे ते शिक्षक आहेत, असे ते म्हणाले. या समारंभासाठी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले की, प्रा. रमेश भुजबळ हे उत्तम शिक्षक आहेत. त्यांनी समर्पित भावनेने सेवा केली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी प्रास्ताविक, स्वागत केले, व शुभेच्छा दिल्या.

रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे, माजी सहसचिव प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील, माजी सहसचिव उत्तमराव आवारी, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, मिलिंद दरेकर, प्रा.विनोद सासवडकर, अजिंक्य भुजबळ इत्यादींनी मनोगते व्यक्त केली. व शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रा.रमेश भुजबळ व सौ. सीमा भुजबळ यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या आई-वडिलांचाही सत्कार करण्यात आला.

सत्कारमूर्ती प्रा.रमेश भुजबळ यांनी आपल्या मनोगतातून आपली जडणघडण सांगितली. या समारंभासाठी महावीर पटवा, प्राचार्य शहाजी मखरे, प्राचार्य राजपुरे सर, नगरसेवक राजेंद्र खेडकर, प्राचार्य दिलीप भुजबळ, रवीशेठ दंडनाईक, संतोष दरेकर, अंबादास दरेकर, सुनील अनभुले, प्राचार्य डॉ. ज्ञानदेव भोसले, प्रा. विजयकुमार नन्नवरे, प्रा. शिवाजी सोनावळे, सलीम सय्यद, अशोक गोंधळी,डॉ.नितीन थोरात, डॉ. सुदाम भुजबळ इत्यादी या समारंभासाठी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. संजय फटे यांनी केले. आभार पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे यांनी मानले.

## जनगणना कामकाज प्रामाणिकपणे पार पाडा : जिल्हाधिकारी डॉ.आशिया



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : जनगणना देशाच्या नियोजन प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून प्रत्येक प्रगणकाने आपली जबाबदारी अचूक व प्रामाणिकपणे पार पाडावी. नागरिकांशी संवाद साधताना नम्रता, विश्वासार्हता राखावी. प्रत्येक घरातील माहिती अचूकपणे नोंदवत जनगणना प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी जबाबदारीची जाणीव ठेवावी. समन्वय, सातत्य, शिस्त यांना प्राधान्य देऊन काम वेळेत पूर्ण करावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी केले. ते कर्जत येथे राष्ट्रीय जनगणना प्रगणक प्रशिक्षण भेटीप्रसंगी बोलत होते. यावेळी कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील उपस्थित होते.

कर्जत येथे राष्ट्रीय जनगणना प्रगणक यांचे प्रशिक्षण सुरू आहे. अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया कर्जत तालुका दौऱ्यावर आले असता त्यांनी प्रशिक्षण शिबिरास भेट देत प्रगणकांशी संवाद साधला. यासह जनगणना करताना सर्वसामान्य नागरिकांशी संवाद साधताना मूलभूत बाबींवर सकारात्मक चर्चा केली. तसेच कर्जत तालुक्यातील जनगणना प्रक्रियेची माहिती घेतली. यात कर्जत तालुक्यातील घरांची, कुटुंबांची संख्या, माहिती संकलित करण्यासाठी ६९ पर्यवेक्षक, ३५८ प्रगणक यांच्याशी वार्तालाप करीत दि. २३ एप्रिल ते ८ मे २०२६ या कालावधीत चार टप्प्यांत प्रशिक्षण माहिती प्रांताधिकारी पाटील यांनी जिल्हाधिकारी आशिया यांना दिली.

यामध्ये प्रगणकांना प्रत्येक टप्प्यात तीन दिवस सखोल मार्गदर्शन केले जाणार असूनबप्रशिक्षणात तांत्रिक बाबी, अर्ज भरण्याची पद्धत, माहिती संकलनातील अचूकता याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाते का ? याबाबत जिल्हाधिकारी यांनी प्रगणक यांच्याकडून प्रत्यक्ष माहिती घेतली. यावेळी संबंधित अधिकारी, प्रशिक्षणार्थी प्रगणक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नागेश विद्यालय 'एन.एम.एम.एस.' परीक्षेत
## ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक
### चार वर्षात मिळणार ५ लाख २८ हजार शिष्यवृत्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**जामखेड** : रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालय जामखेड येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षा (सन २०२५२६) मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेस विद्यालयातील एकूण ९६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

या परीक्षेत ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले असून विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे. चार वर्षात विद्यार्थ्यांना मिळणार ५ लाख २८ हजार शिष्यवृत्ती. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरली आहे.

श्री नागेश विद्यालयात या परीक्षेत आयुष अविनाश बोधले व संचित संतोष खैरे या दोन्ही विद्यार्थ्यांनी १४९ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. या यशाने जामखेड तालुक्यात विद्यालयाचे नाव पुन्हा एकदा सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे.

या परीक्षेत विद्यालयातील ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक आहेत. त्यामध्ये आयुष अविनाश बोधले व संचित संतोष खैरे (दोन्ही १४९ गुण), भोंडवे यश महादेव (१४७ गुण), वराट यशराज शहादेव (१४५ गुण) , भवर यशराज शंकर (१४४ गुण), वटाणे ओंकार सुभाष (१२९), माळी कृष्णा नानासाहेब(१२९), धुमाळ सोहम किशोर (१२८), पवार अथर्व हर्षलकुमार (१२८), सानक सार्थक संदीप (११९), भोसले समर्थ शंकर (९१) या विद्यार्थ्यांचा आहे. त्यांना चार वर्षात मिळणार ५ लाख २८ हजार रुपये.

संचित खैरे व यश भोंडवे या विद्यार्थ्यांना गणित विषयात पैकीच्या पैकी मार्क मिळाले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशात शिक्षकांचा मोठा वाटा आहे. छचवड विभागाचे प्रमुख व बुद्धिमत्ता विषयाचे मार्गदर्शक देशमुख एस.एस., विज्ञान विषयाचे मडके बी.के. व पठाण ए.एन., सामाजिक शास्त्राचे लटपटे डी.व्ही. आणि गणित विषयाचे चौधरे ए.बी. गुरुकुल प्रमुख संतोष ससाणे ,वर्गशिक्षक संतोष पवार यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आमदार रोहित दादा पवार, स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य राजेंद्र कोठारी, हरिभाऊ बेलेकर व विनायक राऊत, मुख्याध्यापक मडके बी.के., पर्यवेक्षक जाधवर एस.व्ही. शाळा व्यवस्थापन समिती आणि सल्लागार समितीच्या सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले .

रयत शिक्षण संस्था आणि जामखेड परिसरातून यशस्वी विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## पाथर्डी वनदेवच्या ऑक्सिजन पार्कला 'लोकसहभागाचा श्वास'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी** : वनदेवच्या ऑक्सिजन पार्कला 'लोकसहभागाचा श्वास' पाण्याअभावी सुकणाऱ्या रोपांना नागरिकांनी दिला जीवनदान

पाथर्डी शहरालगत उभारण्यात आलेल्या वन विभागाच्या ऑक्सिजन पार्कमध्ये सध्या एक वेगळाच आणि प्रेरणादायी उपक्रम पाहायला मिळत आहे. पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे सुकण्याच्या उंबरठ्यावर आलेल्या कोवळ्या रोपांना वाचवण्यासाठी 'वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुप'च्या सदस्यांनी पुढाकार घेत लोकसहभागातून झाडांना पाणी देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाला निसर्गप्रेमींचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून, अनेक नागरिक यात सहभागी होण्याची तयारी दर्शवत आहेत.

शहरापासून अवघ्या दीड किलोमीटर अंतरावर, धामणगाव रस्त्यालगत पसरलेला वनविभागाचा डोंगरदऱ्यांनी नटलेला विस्तीर्ण परिसर गेल्या काही वर्षांत निसर्गप्रेमींसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. दहा-बारा वर्षांपूर्वी येथे निसर्ग परिचय केंद्र आणि बालोद्यान उभारून या परिसराचा विकास सुरू करण्यात आला. शांत, प्रदूषणमुक्त आणि रमणीय वातावरणामुळे सकाळ-संध्याकाळ हजारो नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला-पुरुष येथे फिरण्यासाठी येतात.

या भागाची भौगोलिक रचना खडकाळ व मुरमाड असल्याने माती कमी असून, देशी वृक्षांशिवाय इतर झाडे येथे टिकत नाहीत. तरीही वन विभागाने प्रयत्नपूर्वक येथे विविध प्रकल्प राबवले. आमदार मोनिका राजळे यांच्या पुढाकारातून सुमारे सव्वा दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होऊन पाण्याची टाकी, रस्ते, टेहळणी टॉवर, जॉगिंग ट्रॅक, बालोद्यान सुधारणा आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाची कामे करण्यात आली. याचाच भाग म्हणून वड, पिंपळ, औदुंबर, लिंब, तुळस, निलगिरी, अशोका, शतावरी, बेल अशा विविध वृक्षांनी सजलेला ऑक्सिजन पार्क साकारण्यात आला. गेली पंधरा वर्षे या परिसरात फिरणारे हे सदस्य केवळ व्यायामापुरते न थांबता निसर्ग संवर्धनाचे कार्य करत आहेत. अनेक निसर्गप्रेमी तर रोज सकाळी घरून पाण्याची बाटली घेऊन येतात आणि वाटेत दिसणाऱ्या गरजू झाडांना पाणी घालतात.

रविवारी सकाळी या उपक्रमाला अधिक संघटित स्वरूप देत अविनाश मंत्री, राजेंद्र एडके, गणेश पंडित, सुनील उगले, योगेश घोडके, शमाली पठाण, शशिकांत गायकवाड, विनोद पटेल, संजय डोईफोडे, जालिंदर शिरसाठ, विठ्ठल मंत्री, ओमप्रकाश दहिफळे यांच्यासह वनविभागाचे भगवान काकडे आणि सतीश काकडे यांनी एकत्र येत तब्बल दोन तास परिसरात श्रमदान केले.

# पाथर्डीत विद्यार्थ्यांची नव्हे, तर उन्हाशी झुंज देणाऱ्यांची परीक्षा!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यात रविवारी पार पडलेली शिष्यवृत्ती परीक्षा ही केवळ विद्यार्थ्यांच्या बुद्धीची चाचणी न राहता, ती प्रत्यक्षात शरीर आणि सहनशक्तीची कठोर परीक्षा ठरली. सुमारे ४१ अंश सेल्सिअसच्या प्रखर उष्णतेमध्ये, त्यातच तांत्रिक कारणांमुळे खंडित झालेला वीजपुरवठा, आणि अंगावर येणाऱ्या उकाड्याच्या झळाया सगळ्यांचा सामना करत चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

परीक्षा केंद्रांमध्ये बसलेले विद्यार्थी, त्यांच्यावर लक्ष ठेवणारे पर्यवेक्षक आणि संपूर्ण यंत्रणा अक्षरशः घामाघूम झाली होती. बाहेर मात्र वेगळेच चित्र होतेकेंद्राबाहेर झाडांच्या सावलीचा आधार घेत बसलेले पालक, उन्हामुळे लालबुंद झालेले चेहरे, आणि मुलांची काळजी करत उन्हात ताटकळत थांबलेली माणसं. या सगळ्या वातावरणाने एकच प्रश्न निर्माण केलाही परीक्षा नेमकी कोणाची?

जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर शालेय कामकाज सकाळी ७ ते ११ या वेळेत पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र प्रत्यक्षात या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांना सकाळी १० वाजता केंद्रावर बोलावण्यात



आले आणि परीक्षा अकरा वाजता सुरू झालीजेव्हा उन्हाची तीव्रता शिगेला पोहोचलेली होती.

राज्य परीक्षा परिषदेच्या नियोजनानुसार जिल्हाभरातून सव्वा लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. शिक्षण विभागाने काही प्रमाणात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असली तरी दुपारपर्यंत वीजपुरवठा खंडित राहिल्याने बंदिस्त वर्गखोल्यांमध्ये उकाड्याचा त्रास अधिकच जाणवत होता. उन्हाचा लख्ख प्रकाश इतका तीव्र होता की बाहेर पाहणाऱ्यांचे डोळे दिपून जात होते, आणि शहरातील रस्त्यांवरही शांतता पसरली होती.

या पार्श्वभूमीवर राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी विद्यार्थ्यांसाठी आरोग्यविषयक सूचना दिल्यापाणी प्या, डोके झाका, हलका आहार घ्यामात्र प्रत्यक्ष परिस्थितीत या सूचना कितपत उपयोगी पडल्या, हा प्रश्न उपस्थित होतो.

स्थानिक प्रशासनाने आपत्कालीन परिस्थितीसाठी आरोग्य यंत्रणेला सतर्क राहण्याचे आदेश दिले होते, तरीही परीक्षेच्या वेळांमध्ये स्थानिक पातळीवर बदल करून विद्यार्थ्यांना दिलासा देण्याची संधी हुकल्याचे स्पष्ट जाणवते. सकाळीच परीक्षा घेण्याचा पर्याय असताना त्याकडे दुर्लक्ष झाले.

या सर्व प्रकारामुळे पालकांमध्ये नाराजीची लाट उसळली. ही मुलांची परीक्षा नसून आमच्याही सहनशक्तीची परीक्षा आहे, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. लहान मुलांना उष्माघाताचा धोका असताना, अशा कठीण परिस्थितीत परीक्षा घेणे कितपत योग्य, असा सवाल उपस्थित होतो.

एकीकडे शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा कस पाहणारे माध्यम असावे, अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात मात्र शरीर आणि परिस्थितीशी झुंज देण्याची वेळ येत आहे. भविष्यात अशा परीक्षा वेळापत्रकाचे नियोजन करताना स्थानिक हवामान, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि प्रशासनाच्या सूचनांचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.

कारण शेवटी, कोणतीही परीक्षा विद्यार्थ्यांच्या क्षमतेची असावीत्यांच्या सहनशक्तीची नव्हे.

# महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत नवीन आरोग्याचा समावेश

## मेंदूविकार, अस्थिरोग, कॅन्सरवरील उपचार देण्याचा मानस : प्रकाश आबिटकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेप्रमाणेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मेंदूविकार,अस्थिरोग आणि कर्करोगसारख्या गंभीर आजारांवर जनसामान्यांसाठी उपचार उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याची घोषणा राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज केली. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या ३१ व्या स्थापना दिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राज्याचे अपारंपरिक ऊर्जा व दुग्धविकास, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री अतुल सावे, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, यावेळी उपस्थित होते.

भारती हॉस्पिटल येथील नूतनीकरण केलेल्या एकत्रित महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे कार्यालय, अत्याधुनिक नेत्ररोग विभाग व नेत्रपेढी तसेच आय. व्ही. एफ. केंद्राचे उद्घाटन आणि विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्री.आबिटकर म्हणाले, दर्जेदार शिक्षणातून गुणवत्ता जपत समाज घडविण्याचे कार्य भारती विद्यापीठामार्फत घडत आहे. श्री. सावे म्हणाले, छत्रपती संभाजीनगरचा विकास झपाट्याने होत असून एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक उद्योग व्यवसायात होणार आहे. अशा वेळी कुशल, अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर असणार आहे. तसेच आरोग्य व्यवस्थेचीही मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. भारती विद्यापीठाने छत्रपती संभाजीनगरमध्ये शैक्षणिक तसेच आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असेही श्री. सावे म्हणाले. डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, भारती विद्यापीठाचे लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे भव्य शैक्षणिक संकुल उभे राहणार असून पुण्यात भव्य क्रीडासंकुल उभारण्यात येणार आहे, असेही श्री. कदम म्हणाले. डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले, शिक्षणात तंत्रज्ञान हे सहाय्यक साधन आहे, पर्याय नाही. शिक्षणामध्ये मानवीमूल्य, नैतिकता आणि संवेदनशीलता टिकवून ठेवणे तेवढेच महत्त्वाचे आहे. कुलगुरू डॉ. विवेक सावजी म्हणाले, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाने २०० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्वाच्या संस्थांशी आणि विद्यापीठांशी शैक्षणिक सहयोग करार केले आहेत.



यावर्षी विश्वविद्यालयाला महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्पांसाठी २८ कोटी हून अधिक अनुदान नामवंत संस्थांकडून मिळाले आहे. सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजेंद्र उत्तुरकर, प्रा. डॉ. ज्योती मंडलिक यांनी केले.

# कृषी मंत्र्याच्या निवासस्थानी भाजप युवा मोर्चाचे आंदोलन होणार

## पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाची अधिकृत घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी चैतन्य चव्हाण यांच्या दुर्दैवी मृत्यू प्रकरणात न्याय मिळावा, दोषींवर कठोर कारवाई व्हावी तसेच पीडित कुटुंबाला सन्मानजनक मदत मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी १ मे रोजी कृषी मंत्री मा. दत्तात्रय भरणे यांच्या भरणेवाडी येथील निवासस्थानी भाजप युवा मोर्चाच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची अधिकृत घोषणा भाजप युवा मोर्चाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. या पत्रकार परिषदेत चैतन्य चव्हाण यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या निष्काळजीपणाचा तीव्र निषेध करण्यात आला. तसेच संबंधित प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष वैभव सोलनकर यांनी सांगितले की, पुणे कृषी महाविद्यालयात घडलेली घटना ही अत्यंत वेदनादायी व संतापजनक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत हलगर्जीपणा झाल्यामुळे एका होतकरू विद्यार्थ्याचा जीव गेला आहे. या घटनेतील जबाबदार अधिकारी व संबंधितांवर कठोर कारवाई झाल्याशिवाय भाजप युवा मोर्चा स्वस्थ बसणार नाही. ते पुढे म्हणाले, महाविद्यालयीन परिसरात पिण्याच्या पाण्याची सुविधा, वीज यंत्रणा, वसतिगृह व्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या मूलभूत बाबी सुरक्षित असणे अत्यावश्यक आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे चैतन्य चव्हाण यांचा मृत्यू झाला असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. वैभव सोलनकर यांनी इशारा देताना सांगितले की, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास १ मे रोजी भरणेवाडी येथे होणारे आंदोलन तीव्र स्वरूपात करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी भाजप युवा मोर्चा रस्त्यावर उतरून लढा देईल. या पत्रकार परिषदेला जिल्हा अध्यक्ष वैभव सोलनकर,जिल्हा उपाध्यक्ष रोहित शिंदे,तालुका अध्यक्ष जगदीश कोळेकर,उपाध्यक्ष हर्षद जगदाळे,सचिव संदीप केसकर,शहर अध्यक्ष विवेक साळूंके,रघू चौधर,शुभम सूर्यवंशी आदी युवामोर्चाचे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**पत्रकार परिषदेत खालील प्रमुख मागण्या :**

१.चैतन्य चव्हाण यांच्या कुटुंबातील एका पात्र सदस्यास तात्काळ सरकारी नोकरी देण्यात यावी.

२.चैतन्य चव्हाण यांच्या कुटुंबाला किमान १ कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी

३.उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी.

४.दोषी अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी.

५.राज्यातील सर्व कृषी व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये सुरक्षा सुविधांची तातडीने तपासणी करण्यात यावी.

# उष्णतेमुळे लिंबाच्या दरात वाढ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** शहरात उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत असल्याने थंड पेयांना मोठी मागणी निर्माण झाली आहे. परिणामी, रसवंतीगृहे, सरबत विक्रेते तसेच हातगाड्यांवर लिंबाच्या वापरात मोठी वाढ झाली असून बाजारात लिंबाला चांगली मागणी आहे. गुलटेकडी येथील मार्केटमध्ये घाऊक बाजारात सध्या १५ ते २० किलो वजनाच्या एका गोणीला ५०० ते २३०० रुपये दर मिळत आहे. तर किरकोळ बाजारात ग्राहकांना दहा रुपयांना ३ ते ४ लिंबे या दराने विक्री सुरू आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा दरात वाढ झाल्याचे सुत्रांनी सांगितले. उन्हामुळे होणारी अंगाची काहिली कमी करण्यासाठी नागरिक उसाचा रस, लिंबूपाणी, विविध सरबतांचा मोठ्या प्रमाणात आस्वाद घेत आहेत. त्यामुळे एप्रिल महिन्यात लिंबाची मागणी नेहमीप्रमाणे वाढलेली दिसून येत आहे. मात्र, यंदाच्या वर्षी बाजारपेठेत काहीशी वेगळी परिस्थिती पाहायला मिळत आहे. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. याचा थेट परिणाम हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाद्य व्यवसायावर झाला असून अनेक ठिकाणी खाद्यपदार्थांच्या निर्मितीवर मर्यादा आल्या आहेत. परिणामी, या क्षेत्रातून होणारी लिंबाची मागणी लक्षणीयरीत्या घटली आहे. एकीकडे रसवंतीगृहे व सरबत विक्रेत्यांकडून मागणी वाढत असताना, दुसरीकडे हॉटेल व रेस्टॉरंट क्षेत्रातील मागणी घटल्याने बाजारातील एकूण मागणीचे संतुलन बिघडले आहे. तरीदेखील, पुरवठ्याच्या तुलनेत दरात वाढ झाल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. दरम्यान, लिंबाची आवकही नियमितपणे सुरू आहे. पुणे विभागातील नगर, सोलापूर आणि पुणे परिसरातून मोठ्या प्रमाणात लिंबाची आवक होत आहे. याशिवाय, हैदराबाद येथून दररोज सुमारे १०० ते १५० गोण्या बाजारात दाखल होत आहेत. एकूणच दररोज सुमारे १ ते दीड हजार गोण्यांची आवक बाजारात होत असल्याची माहिती मिळते. तथापि, बाजारात दाखल होणाऱ्या लिंबाच्या तुलनेत मागणी कमी असल्याचे व्यापाऱ्यांचे निरीक्षण आहे. एप्रिल महिन्यात सामान्यतः मिळणाऱ्या दरांच्या तुलनेत यंदा काही प्रमाणात चढ-उतार दिसून येत असून, परिस्थिती अजूनही अस्थिर आहे. पुढील काही आठवड्यांत तापमानात वाढ कायम राहिल्यास लिंबाच्या मागणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे, असे लिंबाचे व्यापारी रोहन जाधव यांनी सांगितले.



# दखल

## टाकळी हाजी येथे घोड नदीवरील बंधाऱ्याचे कठडे तुटले

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील घोडनदीवरील के.टी.बंधाऱ्यावर बसविण्यात आलेले लोखंडी कठड्यांचे पाइप तुटल्यामुळे वाहनचालकांसाठी गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या बंधाऱ्यावरून दररोज दुचाकी, चारचाकी तसेच शेतीकामासाठी वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, सुरक्षिततेसाठी असलेले कठडेच तुटल्याने पुलाच्या कडेला आता कोणताही आधार उरलेला नाही. यामुळे एखादे वाहन थेट नदीपात्रात कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात या पुलावरून प्रवास करणे अधिकच जिकिरीचे ठरत आहे. स्थानिक नागरिकांनी आणि ग्रामस्थांनी याबाबत अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत, परंतु अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.शालेय विद्यार्थी, महिला आणि शेतकऱ्यांचा या मार्गावर मोठा वावर असल्याने प्रशासनाच्या या दिरंगाईबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या गंभीर परिस्थितीवर बोलताना चेअरमन शिवाजी घोडे यांनी प्रशासनावर कडक शब्दात ताशेरे ओढले आहेत एखादी जीवितहानी झाल्यानंतरच यंत्रणेला जाग येणार का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला असून तातडीने कठड्यांची दुरुस्ती करण्याची मागणी घोडे यांनी केली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची त्वरित दखल घेऊन सुरक्षितता उपाययोजना हाती न घेतल्यास ग्रामस्थांकडन आंदोलनाचा पवित्रा घेतला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## सविंदणे येथील प्रसिद्ध सनईवादक हरीभाऊ पवार यांचे निधन

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील सविंदणे येथील सुप्रसिद्ध सनईवादक हरीभाऊ पवार (वय ७५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या जाण्याने सांगीतिक क्षेत्रावर शोककळा पसरली असून शिरूर तालुक्याने एक गुणी आणि समर्पित सनई वादक कलावंत गमावला आहे.



हरीभाऊ पवार हे सनई वादनातील मान्यवर नाव म्हणून ओळखले जात होते. 'हरि-नाथा' या नावाने त्यांच्या ताफ्याची ख्याती महाराष्ट्रभर पसरली होती. त्यांच्या सनईच्या सुरांनी असंख्य विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम आणि सांस्कृतिक समारंभांना एक वेगळी उंची मिळाली होती.पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे या ठिकाणी त्यांच्या ताफ्याला मोठी मागणी होती. कोणतेही लग्नकार्य, यात्रा किंवा धार्मिक उत्सव त्यांच्या सनईशिवाय अपूर्ण वाटत असे. त्यांच्या वादनातील माधुर्य, शिस्त आणि पारंपरिकता ची जपणूक यामुळे त्यांनी रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले होते.साधी राहणी आणि उच्च कलात्मकता ही त्यांची ओळख होती. आपल्या सुरेल सनईच्या तालावर त्यांनी अनेकांना मंत्रमुग्ध केले.

त्यांच्या निधनामुळे कुटुंबीयांसह संपूर्ण संगीतप्रेमी समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येत असून सनईचा एक सुरेल आवाज कायमचा थांबला अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

# खेड तालुक्यात गौण खनिजातून १८.८१ कोटींचा महसूल

**पुणे :** जिल्ह्यातील खेड तालुक्यात मागील आर्थिक वर्षात गौण खनिज वसुलीतून तब्बल १८ कोटी ८१ लाख ६९ हजार ४५१ रुपयांचा महसूल जमा झाला आहे. वाळू, मुरूम आणि खडी यांसारख्या गौण खनिजांमधून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर महसूल मिळत असताना अवैध उत्खनन आणि वाहतूक रोखण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलल्याची माहिती तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली.

चालू वर्षात अवैध वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने मोहीम राबवत ६३ वाहनांवर कारवाई केली. त्यातून १ कोटी १५ लाख २७ हजार ९८५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच गौण खनिज उत्खनन व वाहतूक संदर्भातील ४२ प्रकरणांमध्ये सुमारे २७ कोटी रुपयांचा दंड अद्याप थकीत आहे.

या सर्व प्रकरणांची सुनावणी पूर्ण झाली असून दंड न भरणाऱ्या संबंधितांवर महसूल विभागाने कडक कारवाई सुरू केली आहे. संबंधितांच्या सातबारा उताऱ्यावर बोजा चढविण्याची प्रक्रिया सुरू असून त्यापैकी १४ प्रकरणांचा लवकरच लिलाव करण्यात येणार आहे. त्यामुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. दरम्यान, ई-चावडी प्रणालीअंतर्गत शंभर टक्के महसूल वसुली पूर्ण करत खेड तालुक्याने पुणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. महसूल विभागाच्या कार्यक्षम नियोजनामुळे हा टप्पा गाठता आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कारवाई सुरू आहे. महसूल वाढीसोबतच नियमांचे काटेकोर पालन होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.**

**प्रशांत बेडसे,**
**तहसीलदार, खेड**

# पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या एअरवॉल्वची दुरुस्ती करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे :** पुरंदर तालुका पूर्वी दुष्काळी म्हणून ओळखला जात होता. मात्र पुरंदर उपसा जलसिंचन योजनेमुळे ही ओळख आता पुसली जात असून तालुक्यातील उत्तर व पूर्व भाग ऐन उन्हाळ्यातही हिरवाईने नटलेला दिसत आहे. अनेक वर्षे देखभाल व दुरुस्तीच्या कामांकडे दुर्लक्ष झाल्याने या योजनेची अवस्था बिकट झाली होती. तथापि, अलीकडील काळात वेळेवर दुरुस्ती होत असल्याने योजना सुरळीतपणे सुरू आहे. योजनेमुळे शेवटच्या टप्प्यापर्यंत पूर्ण दाबाने पाणी मिळत असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत. मात्र, अनेक ठिकाणी एअरव्हॉल्वमधून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे पाण्याची नासाडी होत असून संबंधित विभागाने तत्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. दरम्यान, पाणीपट्टीत झालेल्या प्रचंड वाढीमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. दिवे पंपहाऊसच्या पुढे पूर्वी दोन पंपांसाठी प्रतितास ७०० रुपये आकारले जात होते. सध्या मात्र एका तासासाठी तब्बल १९६० रुपये आकारले जात असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. अधिकाऱ्यांच्या मते ही आकारणी नियमानुसार असली, तरी शेतकऱ्यांची मात्र देयक भरण्यासाठी दमछाक होत आहे. विशेषतः चिंचावले परिसर व मल्हारगड पायथा भागात पाणी सोडल्यानंतर जाधववाडी येथील टाकीवर मोठ्या प्रमाणात ओव्हरफ्लो होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सर्व पाणी पाईपलाईनमध्ये सामावून घेतले जात नसतानाही संबंधित शेतकऱ्यांकडून पूर्ण रक्कम आकारली जात आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत असून यावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे



# आमदाबाद येथे दोन विद्युत रोहित्र फोडून तांब्याची चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील आमदाबाद हद्दीतील माशेरेमळा परिसरात चोरट्यांनी धाडसी चोरी करत दोन विद्युत रोहित्र (ट्रान्सफार्मर) फोडून त्यातील सुमारे १२० किलो तांब्याच्या तारांची चोरी केल्याची घटना मंगळवारी (दि. २१) उघडकीस आली. या प्रकारामुळे महावितरणचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात भीती व संतापाचे वातावरण पसरले आहे.

याप्रकरणी महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ उत्तम गाडेकर (रा. शिरूर) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. चोरट्यांनी झंझाड-थोरात व रामा पावसे येथील रोहित्रे नियोजनपूर्वक फोडून त्यातील तांब्याच्या तारांवर डल्ला मारला. तसेच रोहित्रातील ऑईल सांडून अतिरिक्त नुकसान केल्याचेही समोर आले आहे.घटनेनंतर ग्रामस्थांनी संताप व्यक्त करत, चोरट्यांचा धाडसाचा कळस झाला आहे, अशी प्रतिक्रिया दिली. वारंवार होणाऱ्या चोरीमुळे स्थानिक सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान,काही दिवसांपूर्वी कृषी पंप चोरी प्रकरणात पोलिसांनी काही आरोपींना अटक केल्याचा दावा केला होता. मात्र मुख्य आरोपी अद्याप फरार असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कृषी साहित्य, पंप, केबल, रोहित्र, पशुधन चोरी तसेच चेन स्नॅचिंगसारख्या गुन्ह्यांत वाढ होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



चोरी प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## सासवडमध्ये 'पुरंदर केसरी'चा थरार

**सासवड :** पुरंदरच्या लाल मातीचे भूषण ठरलेल्या आणि कुस्तीशौकिनांचे लक्ष लागून राहिलेल्या 'पुरंदर केसरी' कुस्ती स्पर्धेचे रविवारी (ता. २६) सासवड येथील काळभैरवनाथ कुस्ती आखाड्यात उत्साहात उद्घाटन झाले. पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने, पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था आणि पुरंदर तालुका कुस्तीगीर संघाच्या वतीने या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सहकारमहर्षी स्व. चंदूकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आणि माजी आमदार संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २० वर्षांपासून ही परंपरा अविरत सुरू आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते महाबली हनुमान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आले. यावेळी चांदीची गदा आणि आखाडा पूजन करून मल्लांना शुभेच्छा देण्यात आल्या. पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघातील एकूण १० वजन गटांत सुमारे १२४ मल्ल या स्पर्धेत आपले नशीब अजमावत आहेत. प्रसिद्ध कुस्ती निवेदक निलेश केचे यांची पहाडी कॉमेंट्री आणि कोल्हापूरच्या राजू आवाळे ग्रुपच्या हलगी वादनाने आखाड्यातील रंगत अधिकच वाढवली आहे. आंतरराष्ट्रीय पंच रोहिदास आमले यांच्या मार्गदर्शनाखाली अनुभवी पंचांचे पथक या स्पर्धेचे काम पाहत आहे.

# आयएलएस लॉ कॉलेजमध्ये रॅगिंग

## एलएलबी द्वितीय वर्षात शिकणार्या पाच विद्यार्थ्यांविरुद्ध गुन्हा

**पुणे :** शहरातील नामांकित आयएलएस विधी महाविद्यालय (आयएलएस लॉ कॉलेज) येथील मुलांच्या वसतिगृहात द्वितीय वर्षात शिकणार्या विद्यार्थ्यावर रॅगिंग झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी 'एलएलबी' चे शिक्षण घेत असलेल्या द्वितीय वर्षात शिकणार्या पाच विद्यार्थ्यांविरुद्ध महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे महाविद्यालयीन क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत एका ३५ वर्षीय विद्यार्थ्याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा 'एलएलबी' चा द्वितीय वर्षात शिक्षण घेत असून तो विधी महाविद्यालयाच्या रस्त्यावरील मुलांच्या वसतिगृहात राहतो. त्याच वसतिगृहात राहणारे द्वितीय वर्षाचे पाच विद्यार्थी असून त्यांनी त्याला शिवीगाळ केली तसेच मानसिक त्रास देत रॅगिंग केल्याची विद्यार्थ्याने तक्रार काही महिन्यांपूर्वी डेक्कन पोलिसांकडे लेखी अर्जाद्वारे केली होती. या अर्जाची पोलिसांनी प्राथमिक चौकशी केल्यानंतर याप्रकरणात अखेर महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, संबंधित विद्यार्थ्याने याबाबत महाविद्यालय प्रशासनाकडेही अर्ज दिला होता. त्यावर महाविद्यालयाने नेमकी कोणती कारवाई केली, याची माहिती घेतली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. डेक्कन पोलिस अधिक तपास करत आहेत.



# वारकऱ्यामध्ये विठ्ठल शोधणारा मुख्यमंत्री महाराष्ट्राने पाहिला : खा. वाघमारे

**पोहेगांव :** पक्षाचं काम न करता पदाचा दुरुपयोग करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचे पद काढून घेण्याचे काम पक्ष करील. पक्षासाठी काम करून जनतेला न्याय देणाऱ्या उमेदवाराला शिवसेनेत काम करण्याची संधी दिली जाईल. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या तत्त्वावर शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करायचं आहे.शेवटच्या घटकापर्यंत न्याय देण्याचे काय एकनाथ शिंदे साहेब यांनी केले आहे. माझ्यासारख्या सर्वसामान्य महिलेला राज्यसभेची खासदारकी बहाल केली. महिला शेतकरी वारकरी व रुग्णांसाठी विविध योजना त्यांनी सुरू केल्या. संत महंतांना संरक्षण ,वारकरी दिंडीला अनुदान, विमा कवच यामुळे त्यांनी महाराष्ट्रातील सर्वसामान्यांचा मुख्यमंत्री म्हणून नाव कोरले.वारकऱ्यामध्ये विठ्ठल शोधणारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रूपाने महाराष्ट्राने पाहिला असल्याचे प्रतिपादन राज्यसभा खासदार शिवसेना शिवसेनेचे उपनेत्या खा ज्योतीताई वाघमारे यांनी केले. त्या कोपरगाव येथे पोहेगाव नागरी पतसंस्थेच्या सभागृहात कोपरगाव विधानसभा पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना बोलत होत्या. अध्यक्षस्थानी माजी खासदार सदाशिवराव लोखंडे होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख नितीनराव औताडे, महिला आघाडीच्या शिवसेना जिल्हाप्रमुख विमलताई पुंडे, युवा सेना जिल्हाप्रमुख महेश देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोकराव नवले, सर्जेराव कदम, शिवाजी जाधव, उपजिल्हाप्रमुख देवा लोखंडे, शिवसेना शहरप्रमुख अध्यक्ष अक्षय जाधव, सुभेदार शांतीलाल होन, देवा लोखंडे प्रल्हाद सारंगधर, वैभव चव्हाण, घनश्याम वारकर, आरतीताई गाडे, सुनील साळुंके, कृष्णा चोरगे, महेश देशमुख, दिगंबर पवार, रमेश काळे, साईनाथ जाधव,भारतीताई शिंपी, वर्षाताई शिंगाडे, बाळासाहेब साळुंके, योगेश उशीर, विकास शर्मा रवी भालेराव अदीसह शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मतदार याद्या पुनर्नरीक्षणावर मार्गदर्शन करण्यात आले. मतदार यादीत आपल्या वार्डातील कोणाचे नाव राहिले असेल किंवा कोणाचे नाव दुबार झाले असेल अशा गोष्टीवर बारकाईने लक्ष देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. बुथ लेव्हल असिस्टंट म्हणून शिवसेनेच्या वतीने बूथ प्रमुखांची नेमणूक करण्यात आली.

द•ख•ल



## स्पर्धा परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे यश

**अहिल्यानगर** : कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेच्या विद्यार्थ्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या कर्मवीर प्रबोधिनी प्रमाणपत्र स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा छाप उमटवली आहे. या परीक्षेत शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी संस्थेच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून अभिमानास्पद कामगिरी केली.

इयत्ता चौथीतील कुमारी अनुष्का धामणे आणि चि. आदित्य औटी यांनी प्रत्येकी ९६ गुण मिळवत संस्थेत प्रथम क्रमांक पटकावला. चि. वेदांत राहींज आणि चि. आयुष सोनमाळी यांनी ९५ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. सरफराज शेख यांनी ९४ गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांनी ५ हजार, द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांनी ३ हजार आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्याने २ हजार रुपयाचे बक्षिस मिळवले.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, डॉ. निक्रड, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, पालक संघाचे सदस्य कैलास गुंजाळ तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये दहावीच्या गुणवंतांचा सत्कार

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता दहावी (शैक्षणिक वर्ष २०२५-२६) मध्ये उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या एकूण २१ विद्यार्थ्यांचा यावेळी पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्राचार्य, उपमुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावर्षीचा दहावीचा निकाल मागील वर्षाच्या तुलनेत अधिक चांगला लागल्याने शाळेत आनंदाचे वातावरण होते. मागील वर्षी ११ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले होते, तर यंदा ही संख्या वाढून २१ वर पोहोचल्याने शाळेच्या गुणवत्तेत झालेली वाढ अधोरेखित झाली शाळेचे प्राचार्य मा. मंगेश जगताप यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, आजचा हा समारंभ आपल्या शाळेसाठी अभिमानाचा क्षण आहे. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी मेहनत, चिकाटी आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून श्री. सचिन धस, श्री. चंद्रकांत ऊरमुडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी कठोर परिश्रम आणि सातत्याचे महत्त्व स्पष्ट करत शाळेने केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

## महापुरुषांना केवळ नाम घोषापुरते मर्यादा ठेवू नका : डॉ. मिलिंद कसबे

**अहिल्यानगर** : महात्मा ज्योतीबा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वाचून समजून घेणे काळाची गरज आहे. आपल्या महापुरुषांना केवळ श्रद्धेचा विषय बनवू नका किंवा त्यांना केवळ नामघोषात अडकवू नका; तर ते विचार कृतीचा भाग बनवा, असे प्रतिपादन डॉ. मिलिंद कसबे यांनी केले. अहिल्यानगर येथील सैनिकी कॅम्प मध्ये आयोजित केलेल्या संयुक्त जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कसबे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आपल्या महापुरुषांना जाती-जातीत बंदिस्त केल्याने मोठी संस्कृतिक हानी झाली आहे. महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांनी कोणत्या जातीचा द्वेष केला नाही. मात्र प्रत्येक जातीत असलेल्या दैववादी, अंधश्रध्देला त्यांनी विरोध केला. त्यामुळे त्यांचे कार्य व्यापक होते, असे ते म्हणाले.पुढे त्यांनी सांगितले की, भारताच्या कृषी धोरणाचा तसेच व्यापार आणि उद्योगाचा पाया महात्मा फुले यांनी रचला आहे. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या वीज, जल आणि कृषि धोरणत फार मोलाचे योगदान आहे.

# ढोरजळगांव येथे निकृष्ट कामाच्या चौकशीसाठी रास्ता रोको

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव** : शेवगाव तालुक्यातील ढोरजळगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुशोभीकरणा अंतर्गत सुमारे १२ लक्ष रुपयांच्या पार्किंग शेड व पेव्हिंग ब्लॉक बसवण्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे . या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे या कामाची तात्काळ चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे. या कामाच्या चौकशीसाठी दि. ४ मे रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांच्यावतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी तहसीलदार शेवगाव व गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या कामासाठी वापरण्यात आलेल्या पेवग ब्लॉक मटेरियल चा दर्जा अतिशय सुमार आहे. पेव्हिंग ब्लॉक बसवण्याच्या कामात देखील मोठा भ्रष्टाचार झाला आहे.

ग्रामस्थांनी वेळोवेळी लेखी मागणी करून देखील पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे अभियंता याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे . यामध्ये ठेकेदार व अधिकारी यांची मिलीभगत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सदर कामात अक्षम्य हलगर्जीपणा झाला असून संबंधित ठेकेदाराची चौकशी करून त्याला काळ्या यादीत टाकून अधिकाऱ्यांवर देखील कारवाई व्हावी.

असे न झाल्यास दि.४ मे रोजी ढोरजळगाव बस स्टॅन्ड चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल. असा इशारा ढोरजळगावचे माजी उपसरपंच राजेंद्र देशमुख, सामाजिक कार्यकर्ते शरद खोसे , काकासाहेब पाटेकर, सचिन काशीद, बबन खोसे, अंबादास माळी, अजय गिऱ्हे, सोमनाथ पाटेकर, रामेश्वर सांगळे, सोमनाथ खोसे, संभाजी पाटेकर, आदिनाथ गर्जे, अमोल खोसे, सोमनाथ पाटेकर आदींसह ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# गायकरवाडीत वृद्धाचा निर्घृण खून

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील गायकरवाडी येथील एका ६० वर्षीय व्यक्तीचा डोक्यात टणक वस्तूने प्रहार करून निर्गुण खून करण्यात आला. गोरख विठोबा वाघमारे असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सदरची घटना गुरुवार ते रविवार या काळात झाली असावी असा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे कर्जत तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, सांडवा वस्ती, गायकरवाडी येथील गोरख वाघमारे हे रविवारी सकाळी त्यांच्या राहत्या घरी मृत अवस्थेत आढळून आले. दि २३ ते २६ एप्रिल या कालावधीत त्यांच्या डोक्यात अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून टणक वस्तूने प्रहार करून गंभीर दुखापत करून जीवे मारले. सदरची घटना गुरुवार ते रविवारी सकाळीच्या कालावधीत घडली असल्याची फिर्याद मयताचा पुतण्या सुभाष कल्याण वाघमारे याने दिली.

घटनास्थळी कर्जतचे पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट यांनी भेट देत मृतदेहाचा रीतसर पंचनामा केला.

मृतदेह शवविच्छेदनासाठी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आला होता. या घटनेचा पुढील अधिक तपास कर्जत पोलिसांनी सुरू केला असून या घटनेने कर्जत तालुक्यात खळबळ माजली असून कर्जत पोलिसांपुढे तपास लावण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

# गायत्री मंदिरातून भरदिवसा चोरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : शहरातील गजबजलेल्या महाजन गल्ली भागातील गायत्री मंदिर हॉलमध्ये एका घरगुती कार्यक्रमादरम्यान अज्ञात चोरट्याने ७२ वर्षीय महिलेचे सुमारे ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अंजली अशोक देशमुख (रा. पुणे) यांनी २४ एप्रिल रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या १९ एप्रिल रोजी दुपारी नगरमधील गायत्री मंदिर हॉल येथे एका कार्यक्रमासाठी आल्या होत्या. दुपारी ३ ते ५ वाजेच्या सुमारास त्या हॉलमध्ये असताना, कोणीतरी अज्ञात चोरट्याने संधी साधून त्यांच्या कानातील ४० हजार ३१० रुपये किमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची कर्णफुले चोरून नेली.

दागिने चोरीला गेल्याचे लक्षात येताच देशमुख यांनी परिसरात शोध घेतला, मात्र चोरट्याचा पत्ता लागला नाही. अखेर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रदीप बड़े करत आहेत.

### ४ मे रोजी पुण्यात 'पेरू वाटप' जमाबंदी आयुक्त कार्यालयावर आंदोलन

# शिव पाणंद शेतरस्त्यांसाठी निर्णायक लढा!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : राज्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय ठरलेल्या शिव पाणंद शेतरस्त्यांच्या समस्यांनी आता तीव्र रूप धारण केले असून, अद्यावत गाव नकाशांचा अभाव आणि शेतरस्त्यांचे सीमांकन प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना दळणवळणात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सविस्तर निवेदन देत ठोस मागण्या मांडल्या आहेत.

प्रमुख मागण्या प्रत्येक गावातील सर्व शेतरस्त्यांचे तातडीने सीमांकन करून अधिकृत नोंद करावी, रस्त्यांना सांकेतिक क्रमांक देऊन डिजिटल नकाशांमध्ये समाविष्ट करावे, गाव नकाशांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करून अचूक मोजमाप (लांबी, रुंदी, अक्षांश-रेखांश) नोंदवावे, रस्त्यांच्या हद्दीवर कायमस्वरूपी सीमा चिन्हे बसवावीत, अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह

२ ऑक्टोबरच्या पार्श्वभूमीवर जाहीर करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान अंतर्गत घेतलेल्या निर्णयांची अद्याप अंमलबजावणी झालेली नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

तसेच अनेक प्रकरणे तालुका भूमि अभिलेख कार्यालयात प्रलंबित ठेवल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

प्रकरणे निकाली काढण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ व यंत्रसामग्री उपलब्ध करावी कामचुकार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून निलंबन व गुन्हे दाखल करावेत, प्रामाणिक अधिकाऱ्यांना पदोन्नती देऊन प्रोत्साहन द्यावे मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास, ४ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पुण्यात जमाबंदी आयुक्त कार्यालयावर भव्य 'पेरू वाटप आंदोलन' छेडण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाबाबतचा इशारा चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य प्रसिद्धीप्रमुख रविंद्र खुडे यांनी जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांना दिला आहे. या निवेदनाच्या प्रती राज्यातील प्रमुख नेत्यांसह पोलिस प्रशासनालाही पाठवण्यात आल्या आहेत.

# काकडे विद्यालयात विविध विषयांवर व्याख्यान

**शेवगाव** : उन्हाळी कला क्रीडा व बाल संस्कार वर्गाचे आयोजन करून विद्यार्थी दशेतच बालकांवर संस्कार करणारी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूह ही एकमेव संस्था असल्याचे प्रतिपादन आज संस्थेच्या चापडगाव हायस्कूल चापडगाव या ठिकाणी शिबिराचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय शिक्षण विभाग प्रमुख प्रा श्रीमती वंदना पुजारी होत्या.

आपल्या व्याख्यानात ते पुढे म्हणाले की, विद्यार्थी तणावमुक्त राहावा त्याच्यावर आई-वडील व गुरुजनांची सेवा करणारा संस्कार निर्माण व्हावा भविष्यातील तो या परिसराचा नव्हे तर देशाचा उत्तम माणूस घडावा या करीता झटणाऱ्या उपक्रमशील व संस्कारक्षम संस्थेत घडत आहोत हे आपले परमभाग्य म्हणावे लागेल.

विद्यार्थ्यांनी रोज सकाळी उठल्यानंतर वडीलधाऱ्यांना नमस्कार करावा, आपल्या सर्व आदर्शांचे चरित्रांचे वाचन करून आपले स्वतःचे वर्तन आदर्श करावे.स्वतःचा शारीरिक विकास करावा .घर शाळा गल्ली बरोबर गाव स्वच्छ राहील यासाठी चे प्रयत्न स्वतःपासून सुरू करावेत कमीत कमी वेळ मोबाईल टीव्ही पासून दूर राहून जास्तीत जास्त वेळ अभ्यास करावा या पंचसूत्रीचा अंगीकार केल्यास खऱ्या अर्थाने संस्कारक्षम पिढी तयार होत असते यावेळी त्यांनी अनेक विचारवंतांचे उदाहरणे दिली विद्यार्थ्यांचे स्पेलिंग जागृत केले. जीवनात प्रार्थनेचे किती महत्त्व आहे हे सोदाहरण स्पष्ट केले




## ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेस ५ कोटी ८ लाखांचा ढोबळ नफा : चेअरमन नागरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** – जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेस सन २०२५ - २६ या आर्थिक वर्षामध्ये ५ कोटी ८ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला असून, आवश्यक त्या तरतुदी रक्कम रुपये ४ कोटी ४० लाख ५८ हजार रुपये वजा जाता संस्थेस निव्वळ नफा ६७ लाख ५२ हजार रुपये झाला असल्याची माहिती चेअरमन सुनील नागरे यांनी दिली.

या नफ्यातून संस्थेच्या सभासदांना याही वर्षी १५ टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळ करणार असल्याचे त्यांनी सांगितले. चेअरमन नागरे यांनी सांगितले मार्च २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेच्या सभासदांच्या पाल्यांच्या शुभविवाह प्रसंगी ११०००/- इतक्या रकमेचा धनादेश देण्यात येतो. दरवर्षी सभासदांना दीपावली निमित्त प्रति सभासद १५किलो साखर वाटप करण्यात येते. मयत सभासदांचे १०० टक्के कर्ज माफ केले जाते. राज्यात पगारदार कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेमध्ये सर्वाधिक कर्ज वितरण करणारी अहिल्यानगर जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था एकमेव पतसंस्था असून तिचा राज्यभर नावलौकिक आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष युवराज पाटील, जिल्हा सरचिटणीस अशोक नरसाळे, व्हा. चेअरमन सुनील वाघ, मानद सचिव सविता भाकरे, संचालक सतिश मोटे, दिलीप नागरगोजे, तज्ज्ञ संचालक एकनाथ ढाकणे, मधुकर जाधव,लक्ष्मण नागरे, पसंस्थेचे व्यवस्थापक प्रदीप कल्याणकर, वरिष्ठ सहायक नफीस खान पठाण आदी उपस्थित होते.

### एनएमएमएस परीक्षेत न्यू इंग्लिश स्कूल मढेवडगाव विद्यालयाचे सुयश

# ९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत : तालुक्यात विद्यालयाचा तिसरा क्रमांक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल मढेवडगाव विद्यालयाचे ९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले.तालुक्यात विद्यालय या स्पर्धा परीक्षेत तिसऱ्या क्रमांकावर आले आहे.ही बाब विद्यालयाच्या गुणवत्तेच्या दृष्टीने गौरवास्पद आहे.

२८ डिसेंबर २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक योजना(छचवड)स्पर्धा परीक्षेत अक्षदा भानुदास बनकर,समृध्दी मुकेश मांडे,सार्थक भाऊसाहेब मांडे,आदित्य सुरेश पवार,सार्थक मारुती पारखे,रिद्धी योगेश चाकणे,श्रुती अविनाश शिंदे,श्रेया रविंद्र पवार,सुमेध अमोल ठोकळे हे विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले आहेत.

या विद्यार्थ्यांना नववी ते बारावी अखेर प्रत्येक वर्षी १२ हजार याप्रमाणे अठ्ठेचाळीस हजार शिष्यवृत्ती मिळणार आहे.विद्यालयातील सदर विद्यार्थ्यांना चार वर्षाची एकूण शिष्यवृत्ती चार लाख बत्तीस हजार रुपये मिळणार आहे.

या स्पर्धा परीक्षेसाठी विभाग प्रमुख महादेवी माने(बुद्धिमत्ता)राजेंद्र शेळके(समाजशास्त्र)प्रणव नलगे(गणित)लक्ष्मी बोलणे(विज्ञान)विशाखा साळवे (विज्ञान)विकास चव्हाण यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले. विद्यालयाचे मुख्याध्यापक हौसराव दांगडे, पर्यवेक्षक विलास सुलाखे यांची प्रेरणा मिळाली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय चेअरमन आशुतोष दादा काळे,मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल दादा जगताप,जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस,सल्लागार समितीचे सदस्य स्मितल भैया वाबळे,थोर देणगीदार रवींद्रराव महाडिक,उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडके,सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे,बाबासाहेब नाईकवाडी, उत्तर विभागीय गुणवत्ता कक्ष विभाग प्रमुख काकासाहेब वाळुंजकर,स्कूल कमिटी सदस्य,विद्यालयाच्या विविध समित्यांचे पदाधिकारी आणि सदस्य, सरपंच,उपसरपंच ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य,विविध सोसायटीचे पदाधिकारी आणि सदस्य,ग्रामस्थ,पालक,आजी-माजी विद्यार्थी शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, शिक्षकांचे समर्पित प्रयत्न याचे हे फलित मानले जात आहे.या यशामुळे विद्यालयाचा शैक्षणिक लौकिक वाढला असून परिसरातून समाधान व्यक्त केले जात आहे.सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक ,मार्गदर्शक शिक्षक यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे. ग्रामीण भागातून गुणवत्ता यादीत झळकलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# लग्नात वाटले 'शिवाजी कोण होता?' पुस्तक

## छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास जनतेपर्यंत पोहोचविण्याचा पीपल्स हेल्पलाईनचा उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी पुस्तकाच्या प्रकाशकांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार घडल्याबद्दल पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने शहरातील महेश भोसले आणि दुर्गा चांदणे यांच्या विवाह सोहळ्यात उपस्थित वऱ्हाडी मंडळींना शिवाजी कोण होता? हे पुस्तक वाटप करण्यात आले.

विवाह सोहळ्यात राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून सामाजिक संदेश देण्यात आला. सत्ताधारी आणि अंधभक्तांनी निर्माण केलेल्या तथाकथित भोंदूशाहीला रोखण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. कार्यक्रमात भावनिक राजकारणाला चालना दिल्याचा आरोप करत, देशाला चुकीच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ड. कारभारी गवळी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून ते आजच्या भारतासाठी जिवंत प्रेरणामिशन आहेत. आजच्या समाजात अजूनही जातव्यवस्था आणि स्त्रीदास्याचे अस्तित्व दिसून येते. मात्र, स्वराज्य स्थापनेच्या काळात शिवाजी महाराज आणि जिजाऊ यांनी अन्यायकारक परंपरांना फाटा देत समानता, स्वातंत्र्य आणि स्वाभिमानावर आधारित स्वराज्य उभारले.




त्यांचे राज्य धर्माधारित नव्हते, तर कर्तृत्वाधारित होते. जात नव्हे, कर्तृत्व हीच ओळख हा संदेश त्यांनी आपल्या पराक्रमातून दिला. शिवाजी महाराजांचा वारसा हा केवळ इतिहास नसून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रकाश थोरात म्हणाले की, हिंदू धर्माच्या नावाचा वापर केवळ भावनिक राजकारणासाठी केला जात आहे. समाजात काही तथाकथित भोंदूबाबा महिलांच्या सन्मानावर आघात करून सामान्य लोकांची पिळवणूक करत आहेत. राजकारण आणि समाजकारणात अशा प्रवृत्ती वाढल्यामुळे सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठेसाठी अयोग्य स्पर्धा निर्माण झाली आहे.

काही भोंदूमहाराज आणि राजकारणी चुकीचा इतिहास सांगून समाजाला दिशाभूल करत आहेत. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी नागरिकांनी खरा इतिहास आणि सत्यशोधक विचार स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमात ॲड. कारभारी गवळी, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ससाणे महाराज, महेश भोसले, अशोक भोसले, पोपट भोसले, निर्मला शिंदे, विनायक शेंडगे, काशिनाथ भोसले, बापू शेलार, कल्पना तसेच मानवी अभियानचे जिल्हा संघटक चंद्रकांत घोडके, लखन साळवे यांसह वऱ्हाडी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार, दि.२७ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## शेतीच्या वादातून कुटुंबीयांना मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तुमच्याकडे आमच्यापेक्षा जास्त शेती आहे या कारणावरून झालेल्या वादातून कुटुंबीयांना मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील वरशिंदे येथे २३ एप्रिल रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुभाष सुखदेव नेहे (वय ५०, रा. वरशिंदे) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, २३ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ६.१५ वाजता सुभाष नेहे व त्यांच्या कुटुंबीय घराबाहेर बसले असताना त्यांचा चुलत भाऊ व पुतण्या तेथे आले. तुमच्याकडे आमच्यापेक्षा जास्त शेती आहे असे म्हणत त्यांनी वाद घालत शिवीगाळ सुरू केली. यानंतर आरोपींनी लाकडी दांडा व लोखंडी गजाच्या साहाय्याने सुभाष नेहे व त्यांच्या कुटुंबीयांना मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घटनेनंतर जखमींनी तातडीने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. या प्रकरणी शांताराम सखाराम नेहे व संपत शांताराम नेहे (रा. नेहे वस्ती, वाबळे वाडी रोड, वरशिंदे) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३ (५), ३५१ (२), ३५२ अन्वये गुन्हा रजिस्टर क्रमांक ४१४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# चौंडी येथून महेश्वरला जाणाऱ्या गोदा-नर्मदा जलजागृती यात्रेचे नेवासेनगरीत स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव वर्षानिमित्त अहिल्यानगर जिल्हयाचे पालकमंत्री व राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या दूरदर्शी व कल्पकतेतून व माजी खा. सुजय विखे यांच्या नेतृत्वाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवींची जन्मभूमी चौंडी ते कर्मभूमी असलेल्या मध्य प्रदेशातील इंदूर संस्थान महेश्वर अशी काढण्यात आलेल्या गोदा-नर्मदा जलजागृती यात्रेचे रविवारी नेवासा नगरीत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. अहिल्यादेवींचे जल संवर्धनाविषयी असलेले योगदान मोठे असून त्यांचे हे कार्य नव्या पिढीला कळावे म्हणून गोदा नर्मदा जलजागृती यात्रेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन सुजय विखे यांनी यावेळी केले.





डॉ. सुजय विखे यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या जलजागृती यात्रेमध्ये जलयात्री मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जलजागृती यात्रेचे श्री खोलेश्वर गणपती मंदिर चौकात धनगर समाजाच्या वतीने भंडारा उधळीत क्रेनद्वारे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. सदरची जल जागृती यात्रा नेवासा येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर येथील स्मारक प्रांगणात आली याठिकाणी गोदावरी, प्रवरा, मुळा या तीन नद्यांच्या कलशातील पाण्याचे पूजन डॉ. सुजय विखे व आ. विठ्ठलराव लंघे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या हस्ते करण्यात आले व यावेळी कलश यात्रेसाठी सुपूर्त करण्यात आला. यावेळी नगरपंचायत चौकात झालेल्या सभेच्या प्रसंगी आमदार विठ्ठल लंघे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे कार्य समाजासह पुढच्या पिढीला कळावे म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी जलजागृती यात्रेची धुरा जलसंपदा मंत्री ना. विखे यांच्याकडे सोपवली त्या नुसार ही यात्रा चौंडी येथून सुजय विखे यांची नेतृत्वाखाली येथे आली असल्याचे सांगत त्यांनी जल जागृतीचे महत्व विषद केले.

यावेळी बोलतांना खासदार सुजय विखे पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महाराष्ट्रासह देशात केलेले जल संवर्धनाविषयी असलेले कार्य मोठे असून त्यांचे हे कार्य नव्या पिढीला कळावे म्हणून अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव वर्षानिमित्त ही गोदा नर्मदा जलजागृती यात्रा काढण्यात आली असून यानिमित्ताने गोदावरी व नर्मदा या दोन नद्यांचा संगम या यात्रेमध्ये झालेला आहे. जलजागृतीचा हा संदेश समाजाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचवा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी समाजाला विचारांसह दिशा देण्याचे काम केले त्यांच्या या कार्याला अनुसरून या जिल्हयाचे नामकरण अहिल्यानगर करण्यात आले. यासाठी मी राज्य सरकारचे आभार मानतो असे सांगून या जलजागृती यात्रेचा संदेश व पाण्याचे महत्व समाजाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचवा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले. नेवासकरांच्या वतीने नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांनी यात्रेतील सहभागी झालेल्या जलयात्रीचे व नेवासकरांचे आभार मानले.

यावेळी झालेल्या जलजागृती यात्रा स्वागत कार्यक्रम प्रसंगी भाजपनेते लक्ष्मण सावजी,जेष्ठ नेते किसनराव गडाख पेशवे,शंकरराव लोखंडे,रामभाऊ खंडाळे,शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार, जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता अलका अहिरराव,मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील,नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले, शिवसेनेचे तालुका विधानसभा प्रमुख भाऊसाहेब वाघ, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, ज्ञानेश्वर माऊली पेचे,किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अंकुश काळे, मराठा महासंघाचे संभाजीराव दहातोंडे,भाजपचे तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे, जलमित्र व्याख्याते सुखदेव फुलारी,शिवसेना महिला तालुका प्रमुख शोभाताई आलवणे, धनगर समाजाचे नेते श्रीमंत कान्हू दाणे, अशोक मिसाळ, बापूसाहेब नजन, नामदेव खंडागळे,महायुतीचे सर्व नगरसेवक, भाजप शिवसेनेचे पदाधिकारी, नागरिक,शेतकरी महिला युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अतिक्रमण धारकांना त्यांच्या नावावर जागा करून देणार : सुजय विखे

यावेळी बोलतांना भाजपचे युवा नेते माजी खासदार सुजयदादा विखे पाटील म्हणाले की नगरपंचायतच्या निवडणूकीच्या वेळेला मी बोलल्याप्रमाणे दिलेला शब्द पाळणार असून लवकरच पुढच्या महिन्यात आमदार विठ्ठलराव लंघे, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्या उपस्थितीत बैठक लावून सर्वांना विश्वासात घेऊन जेवढे लोक अतिक्रमणधारक आहे त्या सर्वांना त्यांच्या नावे जागा करून देणार असल्याची ग्वाही दिली.


**(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

## विवेक कोल्हे यांना विधान परिषेवर संधी?

### शिर्डीत ना. बावनकुळे यांची मनधरणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व कोर कमिटीचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना विधान परिषदेच्या आमदारकी बाबत सर्वाधिकार आहेत . विवेक कोल्हे यांच्या बाबतीत तेच निर्णय घेतील असे स्पष्टीकरण राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल शिर्डीत केले. काल शिर्डीत ना . बावनकुळे यांच्या उपस्थितीत नागरिकांच्या समस्या ऐकून त्याची थेट सोडवणूक करण्यासाठी शिर्डी येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिक निवेदन स्वीकृती उपक्रम प्रसंगी ते शिर्डीत उपस्थित होते. यावेळी कोपरगावच्या माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे व विधान परिषदेचे दावेदार युवा नेते विवेक कोल्हे यांनी ना . बावनकुळे यांची भेट घेत आम्हाला विधान सभेच्या च्या वेळी विधान परिषदेवर घेण्याचा शब्द पूर्ण करा अशी मागणी करत विधान परिषदेवर घेण्याचा शब्द खरा करावा या साठी मनधरणी केली . यावर बोलताना



.ना बावनकुळे म्हणाले की मुख्यमंत्री फडवणीस व अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या कोर कमिटीने विधान परिषदेसाठी इच्छुक असलेल्या ३० जणांची यादी केंद्राकडे पाठवली आहे ते जो निर्णय देतील तो मान्य करावे लागेल मात्र विवेक कोल्हे यांना विधान सभेच्या वेळी विधान परिषदेच्या दिलेला शब्द विचारात घेतला जाईल असे म्हणाले. दरम्यान नामदार बावनकुळे यांच्या या वक्तव्यामुळे विवेक कोल्हे यांची यांना विधान परिषदेवर विधान परिषद मिळवण्याच्या संधीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## बेलसर टोल नाक्यावर युवक काँग्रेसचे आंदोलन

### स्थानिकांसाठी टोल माफीची मागणी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुरंदर** : स्थानिक नागरिकांना टोलमाफी मिळावी, या प्रमुख मागणीसाठी पुणे जिल्हा युवक काँग्रेस व पुरंदर तालुका युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने जेजुरी येथील बेलसर टोल नाक्यावर जोरदार आंदोलन छेडण्यात आले.

या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी भर रस्त्यावर प्रतिकात्मक गोंधळ घालत सरकारविरोधात घोषणाबाजी केली. संभळ, तुणतुने, ताशा-हलगी वाजवत आंदोलनाला पारंपरिक स्वरूप देण्यात आले होते. पुरंदर तालुक्यातील नागरिकांना आपल्या भागातच वारंवार प्रवास करताना टोल भरावा लागत असल्याने स्थानिकांवर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करत आंदोलनकर्त्यांनी टोलमाफीची मागणी लावून धरली.

स्थानिकांना टोलमुक्ती द्यावी, या मागणीसाठी जेजुरीच्या खंडेरायाला साकडं घालत प्रशासनाला सुबुद्धी देण्याची प्रार्थनाही करण्यात आली. या वेळी पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष उमेश पवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली. जोपर्यंत स्थानिकांना टोलमाफी मिळत नाही, तोपर्यंत युवक काँग्रेस स्वस्थ बसणार नाही. जर मागणी मान्य झाली नाही, तर आणखी तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन उभे केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. स्थानिकांच्या न्याय व हक्कासाठी शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष लहू आण्णा निवंगूने, माजी जिल्हा परिषद सदस्य दत्ता शेठ झुरुंगे, पुरंदर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष साहेबराव फडतरे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, मीडिया चेअरमन अक्षय जैन, ओबीसी अध्यक्ष राजेंद्र बरकडे, किसान सेलचे सचिन दुर्गाडे, युवक प्रदेश सचिव विश्वजीत जाधव, मेघशाम धर्मवत, दिनेश सरताले, अथर्व सोनार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संगमनेरात ‘शिवाजी कोण होता’ पुस्तकाचे सामूहिक वाचन

### बेताल वक्तव्याचा निषेध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित ‘शिवाजी कोण होता?’ या पुस्तकाबाबत करण्यात आलेल्या बेताल वक्तव्याच्या निषेधार्थ संगमनेर येथे नागरिकांच्या वतीने सामूहिक वाचनाचे आयोजन करण्यात आले. नेहरू गार्डन येथे मोठ्या उत्साहात झालेल्या या उपक्रमात विविध पुरोगामी संघटनांचे कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या उपक्रमाची संकल्पना युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी मांडली होती.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ‘रघुपती राघव राजाराम’ व ‘वैष्णव जनतो’ या भजनांनी करण्यात आली. त्यानंतर शिवगर्जना देत सामूहिक वाचनास प्रारंभ झाला. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, छात्र भारतीचे अनिकेत घुले, प्रा. बाबा खरात, विलास कवडे, सोमेश्वर दिवटे, सुभाष सांगळे, राम आरगडे, राजा आवसक, ड. समीर लामखेडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुस्तकातील छत्रपती शिवाजी महाराजांचा सर्वधर्मसमभाव, महिलांप्रती आदर आणि समतेचा विचार अधोरेखित करत उपस्थितांनी हे पुस्तक घराघरात पोहोचावे, अशी भावना व्यक्त केली. कोणतेही वाचन न करता पुस्तकावर टीका करणाऱ्यांच्या वक्तव्याचा निषेधही यावेळी करण्यात आला.

माजी आमदार डॉ. तांबे म्हणाले की, अशा प्रकारच्या वक्तव्याचा संपूर्ण महाराष्ट्राने निषेध करावा. असभ्य भाषा आणि गुंडगिरी करणाऱ्या प्रवृत्ती



लोकप्रतिनिधी कशा होतात, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

समाजाने अधिक सजग होण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण जगाचे प्रेरणास्थान असून त्यांनी दिलेला समानता व महिला सन्मानाचा विचार समाजासाठी मार्गदर्शक आहे. समाजात विकृत प्रवृत्तीला थारा न देता शिवविचार पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, दलित पँथर, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, छात्र भारती, आरपीआय आदी विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित नागरिकांना पुस्तकाच्या प्रती वाटप करण्यात आल्या.

## सोशल मीडियामुळे संवाद सुलभ मात्र नात्यातील ऊब गायब

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : सण-उत्सव, वाढदिवस, पुण्यतिथी, जयंती, लग्नसमारंभ किंवा अगदी शोकसभांच्या निमंत्रणांपर्यंत सर्व काही आता सोशल मीडियावरूनच पोहोचवले जात असल्याने प्रत्यक्ष संवादाने एकमेकांचा निरोप घेतला आहे. मोबाईलवरील आकर्षक इमेजेस आणि संदेशांच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव होत असला, तरी माणसामाणसातील थेट संवाद कमी होत चालल्याने त्याचे समाजमनावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे फेसबुक, व्हॉट्सॲपसारख्या माध्यमांवर दररोज शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव होतो. सणासुदीच्या दिवशी किंवा त्याआधीच हजारो संदेश मोबाईलवर जमा होतात.

यामुळे प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देण्याची परंपरा हळूहळू लोप पावत चालली आहे. पूर्वी कोणताही आनंदाचा क्षण असो किंवा दुःखाची वेळ, नातेवाईक व मित्रमंडळी एकमेकांना भेटून संवाद साधत असत. त्या भेटीतून नात्यांची उब वाढत असे. आता मात्र एका क्लिकवर शुभेच्छा पाठवून कर्तव्य पूर्ण केल्याची भावना निर्माण होत आहे. परिणामी, मानवी नात्यांमधील जिव्हाळा कमी होत असल्याची खंत व्यक्त होत आहे. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे शहरांमध्ये नात्यांमधील उब हरवत चालली आहे. ग्रामीण भागात अजूनही काही प्रमाणात परंपरा टिकून आहे, मात्र तीही धोक्यात आहे, असे व्यस्त जीवनशैलीत सोशल मीडियाचा वापर अपरिहार्य झाला आहे. मात्र त्याचा अतिरेक घातक ठरत आहे. त्याचे फायदे जितके आहेत, तितकेच तोटेही आहेत. त्यामुळे याबाबत प्रत्येकाने स्वतः निर्णय घेण्याची गरज आहे. पूर्वी शुभेच्छा देण्यासाठी प्रत्यक्ष भेटीगाठी होत असत. त्यामुळे नात्यांमध्ये जवळीक वाढत होती.

आता मात्र फक्त मोबाईलवरून संदेश पाठवून औपचारिकता पूर्ण केली जाते. त्यामुळे आपली संस्कृतीच हरवत चालली आहे, एकूणच, सोशल मीडियामुळे संवाद सुलभ झाला असला तरी त्याचा अतिरेक मानवी नात्यांतील उब कमी करत असल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा योग्य वापर करताना प्रत्यक्ष संवादाची परंपरा जपण्याची गरज अधोरेखित होत आहे.

# राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी ‘गोदा ते नर्मदा’

## जलयात्रा नव्या जल क्रांतीची दिशा : आ.आशुतोष काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाराष्ट्र राज्याला प्रगतीच्या दिशेन घेवून जात आहेत. संपूर्ण देशात आपले राज्य सर्वच क्षेत्रात प्रगतीच्या बाबतीत अव्वल कसे राहील यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु असून विकसित राज्य करण्यासाठी संपूर्ण राज्य पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे.त्यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रेच्या माध्यमातून शाश्वत पाणी व्यवस्थापन संकल्पना अधिक बळकट होवून राज्याला दुष्काळमुक्त



करण्यासाठी ‘गोदा ते नर्मदा’ जल यात्रा नव्या जल क्रांतीची दिशा ठरणार असल्याचा विश्वास आमदार आशुतोष काळे यांनी व्यक्त केला.

जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा अंतर्गत मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व राज्याचे जलसंपदा मंत्री विखे यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधत २५ ते २९ एप्रिल ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर रविवार (२६) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते कोपरगाव मतदार संघातील कुंभारी येथे दक्षिण वाहिनी गोदावरी नदीच्या पाण्याचे विधिवत जल पूजन करून या पाण्याचा जल कुंभ पाटबंधारे विभागाचे उपअभियंता संदिप पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी ह्या देशातील दूरदर्शी व लोकाभिमुख शासक म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी गरीब, वंचित, शेतकरी आणि सामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून कारभार केला. घाट धर्मशाळा, तीर्थक्षेत्र विकास, पाणी व्यवस्थापन, लघु सिंचन आणि समाज हिताच्या अनेक प्रभावी कामातून त्यांनी आदर्श सुशासन कसे असावे याचा आदर्श घालून दिला आहे.

जनतेला दुष्काळाच्या झळा जाणवू नये यासाठी लघु कालव्यांचे जाळे उभारणे, पाणी साठवण आणि जलसंवर्धन, शेतीपूरक विकास हे अहिल्यादेवींचे जलसंवर्धनातील कार्य प्रेरणादायी असून ह्या प्रेरणेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रेचे आयोजन संकल्पना अत्यंत चांगली आहे. या ‘गोदा ते नर्मदा’ जल यात्रेच्या माध्यमातून राज्यातील जलव्यवस्थापन अधिक प्रभावी, लोकाभिमुख व शाश्वत होण्यास मदत होवून जलसंवर्धनाचा संदेश प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात झालेली जलसंधारणची कामे त्या सोबतीला ‘गोदा ते नर्मदा’ जल यात्रेमुळे महाराष्ट्र राज्य नक्कीच दुष्काळ मुक्तीवर मात करील व राज्यातील शेतकरी, जनता सुखी होईल असा आशावाद आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी व्यक्त केला. व ‘गोदा ते नर्मदा’ जल यात्रा हा विशेष राज्यव्यापी उपक्रम हाती घेतल्याबद्दल महायुती शासन व राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्णजी विखे पाटील यांचे आभार मानले.

यावेळी प.पू.राघवेश्वरनंदगिरीजी महाराज, गोदावरी पाटबंधारे कोपरगाव उपविभागाचे उपअभियंता संदिप पाटील, स्व. नामदेवरावजी परजणे गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, संभाजीराव काळे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सूर्यभान कोळपे, प्रशांत घुले, विष्णु शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास केकाण, जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे संचालक नानासाहेब चौधरी, माजी उपसभापती वाल्मिकराव कोळपे, डॉ. आय. के.सय्यद, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.